दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २१८ । शुक्रवार २२ मे २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

**सहजयोग हा सर्वांचा जन्मसिद्ध हक्क आहे...**



'सहजयोग'
भाग ५८

परमेश्वराला नावावर जो मनुष्य पैसे कमावतो, आणि तेही नीतिमत्तेला सोडून, परमेश्वराला तर सोडून आहेच पण नरकात जाण्याची पूर्ण व्यवस्था आहे. तेव्हा हे लक्षात ठेवलं पाहिजे की जो मनुष्य आपल्याकडून देवाच्या नावावर कधीही पैसे मागतो, तो मनुष्य खरा नाही.

आता दुसरी गोष्ट माणसाला ही समजत नाही की काहीही केल्याशिवाय सहजयोग कसा गाठता येतो? सहज, सह म्हणजे तुमच्या बरोबर आणि ज म्हणजे तुमच्या बरोबर जन्मलेला, हा योगाचा जन्मसिद्ध हक्क आहे. जसं स्वातंत्र्य हा तुमचा जन्म सिद्ध हक्क आहे. तसेच 'स्व' तंत्र मिळवणेसुद्धा, 'स्व' चे तंत्र मिळवणेसुद्धा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे. त्याच्यासाठी तुम्हाला काहीही विशेष मेहनत करायला नको. मेहनत जी करायची असते ती गुरूंनी करायची असते. सद्गुरूंना मेहनत करायची असते. शिष्यांना काहीही मेहनत करायची नसते. कारण त्यांना तर काहीच माहित नाही.अजाण आहेत.समजा जर एखाद्या माणसाला आपण पोहायला शिकायला घेऊन गेलो आणि जर तो धडपडू लागला तर हमखास खाली जाणार. पण जो शिकवणारा असतो, तो त्याला सांगतो,तू बाबा शांत रहा. मी सांगतो तसे हातपाय कर म्हणजे तुला शिकता येईल. नंतर तो शिकल्यावर दुसऱ्यांना शिकवू शकतो. असंच आपलं सुद्धा आहे. ०२ मे १९८४ कोल्हापूर

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### शाईफेक झालेले विकास लवांडे पोलिसांच्या ताब्यात!



पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना पोलिसांनी पोलिसांनी ताब्यात घेतले. एका खोट्या फिर्यादीवरून आपल्याला अटक करण्यात आल्याचा दावा विकास लवांडे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून केला आहे. माझ्यावर जीवघेणा हल्ला करणारे गुंड संग्राम भंडारे व इतर सर्व आरोपी मोकाट असून वाघोली पोलीस स्टेशनचे पोलिस एका खोट्या फिर्यादीवरून कसलाही पुरावा नसताना मला अटक करण्यासाठी मला फोन न करता रात्री घरी आले मी घरी नव्हतो. कुटुंबीयांना माझ्या अटकेबाबत निरोप दिला कुटुंबांना घाबरवण्याचा हा प्रयत्न होता काय? असा माझा सवाल आहे? पोलीस मला फोन करू शकले असते. मी फरार नाही किंवा माफीवीर नाही. शासनाने मला जरूर अटक करावी मी पोलिसांना सहकार्य करणारा माणूस आहे कारण मी कायदा पाळणारा माणूस आहे, कायदा हातात घेणारा माणूस नाही. सत्यासाठी लढत राहणार सत्याग्रही पद्धतीने जामीन, वकील, दंड देणार नाही. पुणे पोलिसांनी मला जरूर अटक करावी मी तयार आहे.

# विधान परिषदेसाठी महायुतीत तिढा

## १७ जागांचे वाटप ठरेना : भाजप १२, शिवसेना ७, तर राष्ट्रवादीचा ५ जागांवर दावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांची निवडणूक महायुती म्हणून एकत्र लढविणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले असले तरी १७ जागांवर भाजप, शिवसेना व राष्ट्रवादीने केलेल्या दाव्यांमुळे महायुतीत तिढा निर्माण झाला आहे.

विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या १७ पैकी १२ जागा लढविण्यावर भाजप आग्रही आहे. ठाणे, नाशिक, संभाजीनगरसह सात जागांसाठी शिवसेनेने (शिंदे गट) दावा केला आहे. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला तीन जागा हव्या आहेत आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांनंतर महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायतींमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची संख्या पाहता भाजपची ताकद वाढलेली आहे. त्यामुळे भाजप १७ पैकी १२ जागा लढवण्यावर ठाम आहे. उर्वरित पाचपैकी तीन शिवसेनेला (शिंदे गट) आणि दोन राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) देण्याची भाजपची योजना आहे. परंतु, शिवसेनेने विधानसभा, महापालिका निवडणुकीप्रमाणे याहीवेळेस ठाणे, नाशिकसह संभाजीनगरकरिता आपली ताकद पणाला लावली आहे. छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात भाजपचे संख्याबळ अधिक असले तरी शिवसेना या जागेसाठी आग्रही आहे. शिवसेना-भाजप युती असताना २०१९ साली झालेल्या निवडणुकीत ही जागा भाजपने तेव्हा एकसंध असलेल्या शिवसेनेला सोडली होती. तशी ती याही निवडणुकीत सोडावी, असा शिवसेनेचा आग्रह आहे. ठाण्यातही भाजपचे संख्याबळ अधिक आहे. परंतु उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ही जागा आपल्याकडे कायम राहावी, असा शिवसेनेचा दावा आहे. शिवसेनेने नाशिक, कोकण, यवतमाळच्या जागांची मागणी केली आहे. (पान ४ वर)

### जागावाटपाचे सूत्र ठरलेले नाही : शिंदे

विधान परिषदेच्या आगामी निवडणुकांसाठी भाजपच्या नेत्यांकडून १२ जागा भाजपला, तीन जागा शिंदे गट तर दोन जागा राष्ट्रवादीला असे जागावाटप करण्याची योजना मांडली जात आहे. त्याबाबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना विचारले असता, जागावाटपाचा असा कोणतेही सूत्र अद्याप ठरलेला नाही. तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून यावर चर्चा करतील आणि त्यानंतरच जागावाटपाचा निर्णय घेतला जाईल, असे स्पष्टीकरण त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिले.

### निवडणूक होणारे मतदारसंघ

ठाणे ■ रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग ■ सोलापूर ■ अहिल्यानगर ■ जळगाव, सातारा-सांगली ■ पुणे ■ नांदेड ■ यवतमाळ ■ रायगड-सिंधुदुर्ग-रत्नागिरी ■ नाशिक ■ भंडारा-गोंदिया ■ वर्दा-चंद्रपूर-गडचिरोली ■ अमरावती ■ बीड-लातूर-धाराशिव ■ परभणी-हिंगोली ■ छत्रपती संभाजीनगर-जालना ■ नागपूर (पोटनिवडणूक)


## सिस पे फसवणूक प्रकरण तापलं...

# संदीप रोडे यांना महिलांकडून कपडे फाडून मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** सिस पे फसवणूक प्रकरणाचा संताप आता रस्त्यावर उतरल्याचे चित्र श्रीगोंद्यात दिसत आहे. या प्रकरणातील एजंट संदीप विठ्ठल रोडे यांना दोन दिवसांपूर्वी बँक ऑफ महाराष्ट्रसमोर मारहाण झाल्यानंतर आज पुन्हा संतप्त गुंतवणूकदार महिलांनी पकडून त्यांचे कपडे फाडत मारहाण केल्याची घटना घडली.

माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी



बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये सोने सोडवण्यासाठी आलेल्या संदीप रोडे यांना काही गुंतवणूकदार नागरिकांनी मारहाण केली त्यानंतर आज पुन्हा वडाळी रोड नजीक गुंतणूकदार महिलांनी घेराव घातला. यावेळी आमचे पैसे परत द्या अशी जोरदार मागणी करत महिलांनी संताप व्यक्त केला.मारहाणीदरम्यान संदीप रोडे यांची कपडे महिलांनी फाडली त्याच्या व्हिडिओ (पान ४ वर)

# २५ हजारांची लाच घेताना विशेष सहाय्यक सरकारी वकील रंगेहात अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**वसई :** वसई न्यायालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी दुपारी एक मोठी कारवाई केली. न्यायालयात दाखल असलेल्या एका प्रकरणातील मालमत्ता परत मिळवण्याच्या अर्जावर (रिटन ऑफ प्रॉपर्टी) अनुकूल म्हणणे मांडण्यासाठी २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना विशेष सहाय्यक सरकारी वकिलाला रंगेहात अटक करण्यात आली आहे.

भुपेश अजित पुरंदरे (४७) असे अटक करण्यात आलेल्या विशेष सहाय्यक सरकारी वकिलाचे नाव असून, ते वसई येथील सह दिवाणी (उच्चस्तर) न्यायालयात कार्यरत आहेत.

तक्रारदाराने वसई येथील न्यायालयात जप्त केलेली मालमत्ता परत मिळवण्यासाठी एक अर्ज दाखल केला होता. या अर्जावर सरकारी पक्षाच्या वतीने अनुकूल म्हणणे किंवा शेरा सादर करण्यासाठी विशेष सहाय्यक सरकारी वकील भुपेश पुरंदरे यांनी तक्रारदाराकडे २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. मात्र, तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे २० मे २०२६ रोजी रीतसर (पान ४ वर)

# महाराष्ट्रावर 'अल निनो'चे संकट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**यंदाच्या हंगामात ८८% पावसाचा अंदाज : फडणवीस**

**मुंबई :** महाराष्ट्रात सर्वात मोठा हंगाम हा खरिपाचा असतो. त्यानंतर रब्बी आणि उन्हाळी पिकं शेतकरी घेतात. खरिपाचं क्षेत्र १५२ लाख हेक्टर आहे. यामध्ये सर्वात मोठं क्षेत्र सोयाबीन आणि कापूस यांचं जवळपास ८८ लाख हेक्टर असतं. ऊसही आपण मोठ्या प्रमाणात घेतो. आता खरीप हंगामात मोठं संकट हे अल निनोचं आहे. आज हवामान विभागाने केलेल्या मांडणीनुसार, पावसाचं लाँग टर्म ॲव्हरेज ८८ टक्के असेल असा अंदाज वर्तवला आहे. असं असलं तरी ते वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारचे असेल. विशेषत: पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राचा काही भाग यामध्ये त्याची तीव्रता अधिक जास्त असण्याची शक्यता आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरीप हंगाम आढावा बैठक घेतली. त्यानंतर पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी नियोजनाबद्दल व अल निनो संकटा बद्दल सविस्तर माहिती दिली. मुख्यमंत्री म्हणाले, शेतकऱ्यांना खरीप हंगामात शेतासाठी पैशांची कमतरता भासू नये यासाठी बँकांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. शेतकरी कर्जमाफी ही ३० जूनपर्यंत करु. यंदा उतरत्या क्रमाने पाऊस असण्याची शक्यता आहे. जूनमध्ये पाऊस येईल. त्यापेक्षा कमी जुलैमध्ये येईल. त्यापेक्षा कमी ऑगस्ट आणि त्यापेक्षा कमी सप्टेंबरमध्ये असा प्राथमिक अंदाज आहे. पावसाच्या दोन दिवसांमध्येही मोठं अंतर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे (पान ४ वर)

## तुझ्या मुलांना आम्ही स्वीकारणार नाही...

# आठ वेळा गर्भपात; जातीवरून सुनेचा छळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नाशिक :** प्रेमविवाह केल्यानंतरही 'जात' वेगळी असल्याच्या कारणावरून एका विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याची घटना नाशिकमध्ये उघडकीस आली आहे. तू आमच्या जातीची नाहीस, असे टोमणे मारत सासरच्या मंडळींनी विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केला, तसेच तिचा तब्बल ८ वेळा गर्भपात घडवून आणल्याचा धक्कादायक आरोप आहे. या छळाला कंटाळून अखेर पीडित महिलेने न्यायासाठी पोलिसांचे दार ठोठावले असून, नाशिकच्या म्हसरूळ पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस तक्रारीनुसार, पीडित महिलेचा प्रेमविवाह झाला होता. मात्र, लग्नानंतर काही दिवसांतच तिच्या वेगवेगळ्या जातीवरून सासरच्या लोकांनी छळ सुरू केला.

■ **नाशिकमध्ये स्वत:चे घर खरेदी करण्यासाठी पतीने विवाहितेचे सोन्या-चांदीचे दागिने मोडून पैसे घेतले होते. त्यानंतरही पैशांसाठी आणि हुंड्यासाठी तिचा छळ केला जात होता. केवळ जात वेगळी असल्याच्या कारणावरून तिला घरात आणि समाजात सन्मानाने जगू दिले जात नव्हते, असे पीडितेने पोलिसांना सांगितले.**



महिलेला गर्भधारणा झाल्यानंतर, तू आमच्या जातीची नाहीस, त्यामुळे तुझ्या मुलांना आम्ही स्वीकारणार नाही, अशी भूमिका सासूने घेतली. सासरच्या घटकांकडून सतत मानसिक दबाव आणून आणि शारीरिक छळ करून विवाहितेचा एक-दोनदा नव्हे, तर तब्बल ८ वेळा गर्भपात घडवून आणण्यात आला. पीडितेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सासू-सासऱ्यांकडून तिला सतत शिवीगाळ केली जात होती. एवढेच नव्हे तर, तुला वेडी ठरवून मानसिक रुग्णालयात ॲडमिट करू, अशी धमकीही तिला देण्यात आली. पीडित महिला पुण्यात नोकरी करत होती. तिथली नोकरी सोडल्यानंतर जुलै २०२५ मध्ये ती नाशिकला परतली. त्यानंतर सासरच्या लोकांकडून होणारा हा छळ अधिकच वाढला.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत म्हसरूळ पोलिसांनी पती विजय महाजन, सासू निर्मला महाजन आणि सासरे दशरथ महाजन या तिघांविरोधात विविध कलम न्वये गुन्हा दाखल केला आहे. जातीभेदातून आणि हुंड्यासाठी झालेल्या या छळामुळे नाशिक परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, म्हसरूळ पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## नीट पेपरफुटी प्रकरण

# बालरोगतज्ञ डॉ. मनोज शिरुरेला सीबीआयकडून अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून आणखी एका आरोपीला सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेला हा आरोपी बालरोगतज्ज्ञ असून डॉक्टर मनोज शिरुरे असे त्याच नाव आहे.

मनोज शिरुरे याने शिवराज मोटेगावकरकडून स्वत:च्या मुलासाठी पेपर खरेदी केल्याचा आरोप आहे. नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयने मनोज शिरुरेला लातूरहून चौकशीसाठी पुण्यात आणलं होतं. या चौकशीनंतर मनोज शिरुला सीबीआयने अटक केली. हा डॉक्टर मनोज शिरुरे मूळचा लातूरचा आहे.

आतापर्यंतच्या कारवाईतील ही पहिली अटक आहे, जी एखाद्या विद्यार्थ्याच्या पालकाला झालेली आहे. आतापर्यंत ज्यांनी नीटचा पेपर फोडला, नीटचा पेपर विकला...यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. परंतु आता नीटचा पेपर स्वत:च्या मुलासाठी खरेदी करणाऱ्या पहिल्या पालकाला सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. त्यामुळे नीट पेपरफुटी प्रकरण आणखी गडद होत आहे.

# २३ व २४ मे रोजी संरक्षण उत्पादनाचे शिर्डीत प्रदर्शन

## विद्यार्थी, नागरिकांना रॉकेट आणि क्षेपणास्त्र पाहाण्याची संधी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** शिर्डी येथील सावळीविहिर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमिताने २३ आणि २४ मे २०२६ रोजी विद्यार्थी आणि नागरीकांसाठी संरक्षण साहीत्याच्या उत्पादनाचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.यामध्ये रॉकेट आणि क्षेपणास्त्र विशेष आकर्षण असणार आहेत.

देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या सावळीविहिर येथील औद्यगिक वसाहती मध्ये निबे गृपच्या संरक्षण उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन होणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवर कार्यक्रमास उपस्थित राहाणार आहेत. अहील्यानगर जिल्हयात प्रथमच कार्यान्वित होत असलेल्या प्रकल्पामुळे अहील्यानगर जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून भविष्यात ओळखला जाईल.या प्रकल्पामध्ये १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफ गोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार असून, प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची क्षमता या कारखान्याची आहे. संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान व कच्चा माल स्वदेशी आहे. हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे.

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत असून यामध्ये रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन व विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली असून, रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के.के. रेंजेस व मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याला आधीपासूनच संरक्षण क्षेत्रातील महत्त्व आहे. संरक्षण उत्पादन प्रकल्पामुळे या ओळखीला अधिक बळ मिळणार आहे.

■ **उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी सकाळी साडेदहा ते पाच या वेळेत विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या व शंभरहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत.यासाठी मोठे स्टॉल प्रकल्पस्थळावर उभारण्यात आले आहेत. जिल्ह्यातील शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी विज्ञानप्रेमी, नागरिक, महीला या प्रदर्शनाला भेट देतील व तरुणांसाठी संरक्षण क्षेत्रातील संधी जाणून घेण्याची ही मोठी संधी निर्माण करुन देण्यात आली आहे.**



# ‘कॉकरोच जनता पार्टी’

## संतापाच्या स्फोटातून व्यवस्थेविरुद्धची डिजिटल क्रांती...?

देशात सध्या एक विचित्र पण अत्यंत अर्थपूर्ण राजकीय घटना घडते आहे. नाव ऐकून हसू येईल, पण आशय ऐकून व्यवस्था हादरली पाहिजे... कॉकरोच जनता पार्टी! छत्रपती संभाजीनगरातील एका तरुणाने सोशल मीडियावर सुरू केलेला हा उपहास आज लाखो बेरोजगार, निराश आणि संतप्त तरुणांचा आवाज बनला आहे. ही केवळ मीम संस्कृती नाही, हा व्यवस्थेविरुद्धचा डिजिटल बंडाचा पहिला स्फोट आहे.

सर्वोच्च न्यायालयातील एका तोंडी टिप्पणीने या वादळाची ठिणगी पडली. बेरोजगार तरुणांना झुरळांप्रमाणे व्यवस्थेत घुसखोरी करणारे म्हणून संबोधल्याची भावना देशातील तरुणांच्या मनात खोलवर जाऊन भिडली. नंतर स्पष्टीकरण देण्यात आले, पण तोपर्यंत उशीर झाला होता. कारण देशातील तरुण आधीच राग, अपमान, असुरक्षितता आणि अन्यायाच्या ज्वालामुखीवर बसलेले आहेत. नीट पेपरफुटी, भरती घोटाळे, स्पर्धा परीक्षांमधील भ्रष्टाचार, लाखो रिक्त पदे आणि रोजगाराचा अभाव, या सगळ्याने तरुणाईला अक्षरशः गुदमरवून टाकले आहे.

आज देशातील लाखो तरुण अभ्यास करतात, स्पर्धा परीक्षा देतात, रात्री झोपत नाहीत, पालकांचे कर्ज वाढते पण शेवटी निकाल काय? पेपरफुटी! सेटिंग! पैशांचा खेळ! राजकीय हस्तक्षेप! एका गरीब पालकाचा मुलगा अभ्यास करून डॉक्टर होण्याचं स्वप्न पाहतो, आणि दुसरीकडे लाखो रुपये मोजून काही लोक पेपर विकत घेतात. ही केवळ परीक्षा व्यवस्थेची चोरी नाही; हा गरीबांच्या स्वप्नांचा खून आहे.

या देशात आज सर्वात स्वस्त गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे सामान्य तरुणाचं आयुष्य. निवडणुकीत भाषणांमध्ये युवा शक्तीचा जयघोष केला जातो. पण प्रत्यक्षात तरुणांचा वापर फक्त मोर्चे, ट्रोलिंग, पोस्टरबाजी आणि निवडणूक प्रचारापुरताच केला जातो. रोजगाराच्या प्रश्नावर मात्र सर्व पक्ष गप्प असतात.




एकीकडे उद्योगपतींचे हजारो कोटींचे कर्ज माफ होतात, तर दुसरीकडे शिक्षणासाठी घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांनी तरुण आत्महत्या करत आहेत. ही असमानता आता उघडपणे जळू लागली आहे.कॉकरोच जनता पार्टीचा खरा अर्थ इथे समजून घ्यायला हवा. झुरळं समूळ नष्ट होत नाहीत, कारण ती टिकून राहतात. व्यवस्थेच्या घाणीमध्येही ती जिवंत राहतात. आजचा बेरोजगार तरुण स्वतः ला त्याच प्रतीकात पाहतो आहे. कारण व्यवस्था त्याला नागरिक मानत नाही, तर ओझं समजते.

हा विनोद नाही ही खोल सामाजिक चीड आहे. या आंदोलनाची सर्वात धोकादायक आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हे पारंपरिक राजकारणाच्या बाहेर जन्माला आलं आहे. ना पक्ष, ना नेता, ना झेंडा, ना जातीय समीकरण... फक्त संताप! सोशल मीडियावर जन्मलेली ही भावना उद्या रस्त्यावर उतरली, तर सध्याच्या राजकीय पक्षांची गणितं पूर्णपणे बदलू शकतात.

राजकीय पक्षांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. बेरोजगारीवर बोलताना आकडे दाखवले जातात, पण रोजगार कुठे आहेत? स्टार्टअप, स्किल इंडिया, डिजिटल इंडिया यांची स्वप्नं दाखवली गेली; पण वास्तवात लाखो तरुण डिग्री घेऊन घरी बसले आहेत. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या मुलांच्या डोळ्यांखालील काळी वर्तुळे ही या देशाच्या अपयशी व्यवस्थेची स्वाक्षरी आहे. आज परिस्थिती अशी झाली आहे की तरुणांना नोकरी नाही, पण राग आहे. भविष्य नाही, पण इंटरनेट आहे. आणि इतिहास सांगतो की, जेव्हा संतप्त तरुणांच्या हातात संवादाची साधनं येतात, तेव्हा मोठमोठ्या व्यवस्था कोसळतात. या देशात बेरोजगारीचा प्रश्न केवळ आर्थिक राहिलेला नाही; तो मानसिक आणि सामाजिक संकट बनला आहे. लाखो तरुण नैराश्यात आहेत. सोशल मीडियावर विनोद, मीम्स आणि ट्रोलिंगच्या मागे दडलेली ही पिढी प्रत्यक्षात आतून कोसळत आहे. कॉकरोच जनता पार्टीचा उपहास म्हणजे त्या वेदनेचा डिजिटल मुखवटा आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे राजकीय व्यवस्थेचा वाढता अहंकार. लोक शांत आहेत म्हणजे त्यांना काही समजत नाही, असा गैरसमज सत्ताधाऱ्यांनी करून घेतला आहे. पण जनता बोलत नाही याचा अर्थ ती अंध नाही. देशातील तरुण सर्व काही पाहत आहेत. पेपरफुटी, भ्रष्टाचार, घराणेशाही, नोकऱ्यांमधील अन्याय, पैशांचा खेळ आणि संधींची विषमता, ही आव्हाने त्यांना कळतात. आज कॉकरोच जनता पार्टी हा विनोद वाटतो आहे. पण प्रत्येक मोठ्या बंडाची सुरुवात समाजाने आधी विनोद समजूनच खिल्ली उडवली होती. ही ठिणगी आहे व्यवस्थेविरुद्धच्या उफाळणाऱ्या असंतोषाची. ही घोषणा आहे आम्हाला कमी लेखू नका! आणि बेरोजगार तरुण आता फक्त परीक्षा देणार नाहीत ते प्रश्न विचारणार आहेत, परीक्षा घेणार आहेत, असा हा इशाराही आहे. देशातील राजकीय पक्षांनी, न्यायव्यवस्थेने आणि सत्ताधाऱ्यांनी हा आवाज वेळेत ऐकला नाही, तर उद्याची तरुणाई केवळ मतदान पेटीतून नव्हे, तर संतापातून नवा इतिहास लिहू शकते...

# शनि जयंतीत भाविकांसाठी मोफत पार्किंग

## पोलीस प्रशासनाकडून सयाराम बानकर यांचा गौरव




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : शनिशिंगणापूर येथे यंदा शनि अमावस्या आणि शनि जयंती एकत्र आल्याने तब्बल सात ते आठ लाख भाविकांनी शनिदर्शनासाठी गर्दी केली होती. त्यामुळे वाहतूक व पार्किंग व्यवस्थेचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले होते. अशा परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत शिंगणापूरचे राज्यपाल पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील ॲड. सयाराम पाटील बानकर यांनी स्वतः ची शेती भाविकांच्या वाहन पार्किंगसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिली. त्यांच्या या कार्याबद्दल शनिशिंगणापूर पोलीस स्टेशनकडून प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, मोजे कांगोणी शिवारातील गट क्रमांक १८९ मधील सुमारे २ हेक्टर ४१ आर जमीन पार्किंगसाठी खुली करण्यात आली होती. त्यामुळे हजारो वाहनधारकांना सुरक्षित व सुलभ पार्किंगची सुविधा मिळाली. तसेच वाहतूक कोंडी टाळण्यास आणि नियोजन सुरळीत ठेवण्यास मोठी मदत झाली. शनिशिंगणापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांनी प्रशस्तीपत्र देत सयाराम बानकर यांच्या जनहिताच्या कार्याचे कौतुक केले. मोठ्या धार्मिक उत्सवांमध्ये स्थानिक नागरिकांचे सहकार्य प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, स्वर्गीय बाबुराव बानकर यांनी देवस्थानची चार दशके निस्पृह सेवा केली होती. त्यांच्याच सेवाभावी संस्कारांचा वारसा सयाराम बानकर यांनी जपल्याची भावना परिसरातून व्यक्त होत आहे. आगामी देवस्थान विश्वस्त मंडळात बानकर कुटुंबातील प्रतिनिधीला स्थान मिळावे, अशी मागणीही नेवासा तालुक्यातून होत आहे.

# राहुरी शहराच्या दुरावस्थेबाबत पालकमंत्र्यांची भेट घेणार : दादा सोनवणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शहरातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून कुलकर्णी हॉस्पिटल ते शुक्लेश्वर चौक दरम्यानचा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत आहे. नागरिकांना या मार्गावरून चालणेही कठीण झाले असून पावसाळ्यापूर्वी हा रस्ता तातडीने पूर्ण करण्याची गरज असल्याचे मत राहुरी नगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दादा पाटील सोनवणे यांनी व्यक्त केले.



शहरातील प्रलंबित विकासकामांबाबत लवकरच जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोनवणे म्हणाले की, स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून या रस्त्यासाठी निधी मंजूर करण्यात आला होता. व्यापारी, ग्राहक आणि नागरिकांच्या मागणीनुसार हे काम सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, काही स्थानिकांनी या कामाला विरोध करत पालिका प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला, त्यामुळे काम रखडले. आता भूमिगत गटारीचे काम पूर्ण झाले असून रस्ता तातडीने होणे आवश्यक आहे.

यापूर्वी शुक्लेश्वर चौक ते कानिफनाथ चौक या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित रस्त्याचे कामही तातडीने मार्गी लागावे यासाठी पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सोनवणे यांनी स्पष्ट केले.

राहुरी शहरातील अंतर्गत रस्त्यांची स्थितीही अत्यंत बिकट झाली आहे. अनेक विकासकामे गेल्या अनेक वर्षांपासून रखडली असून नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप त्यांनी केला. नवी पेठेतील गणपती मंदिर ते शनिमंदिर दरम्यानच्या दुकानांमध्ये पावसाळ्यात पाणी शिरून व्यापाऱ्यांचे नुकसान होत असल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणून दिली.

महायुती सरकारच्या माध्यमातून शहरासाठी अधिकाधिक निधी आणून स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी पाहिलेले विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजपचे आजी-माजी नगरसेवक आणि पदाधिकारी प्रयत्नशील असल्याचेही सोनवणे यांनी सांगितले. लवकरच भाजप पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ पालकमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# नेवासा नगरपंचायतीत ‘बनावट ठराव’ घोटाळा!

## जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, मुख्याधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा नगरपंचायतीत 'नागरिक दलितेतर वस्ती सुधार योजना २०२५-२६' अंतर्गत कोट्यवधींच्या निधीसाठी चक्क बनावट ठराव तयार केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी उपनगराध्यक्ष शालिनी संजय सुखधान यांच्यासह नगरसेवकांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली असून, मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्यावर फौजदारी व शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या नगरपंचायतीच्या प्रशासकीय सभेत केवळ १२ विषयांवर चर्चा व मंजुरी झाली होती. मात्र, आदेशात मात्र ठराव क्रमांक २०, २२, २३ आणि २४ चा आधार घेऊन विकासकामांना मंजुरी दाखवण्यात आली. सभेचे विषय १२ वर संपले असताना पुढील ठराव आले कुठून? असा थेट सवाल उपस्थित करण्यात आला आहे. धक्कादायक म्हणजे, सभेच्या प्रोसीडिंग पुस्तकात पान ९६ नंतरची सर्व पाने कोरी असून, त्यावर सभेची समाप्ती किंवा प्रशासनाची स्वाक्षरीही नाही.

या संशयास्पद कारभाराबाबत नगरसेवकांनी माहिती अधिकारात कागदपत्रे मागवली होती. त्यावर सभा लिपिक योगेश गवळी यांनी ३१ ऑक्टोबरच्या सभेत केवळ १२ च विषय मंजूर झाल्याचे लेखी पत्राद्वारे अधिकृतपणे स्पष्ट केले आहे. प्रशासकीय कर्मचाऱ्याच्या या खुलाशामुळे मुख्याधिकाऱ्यांच्या आदेशातील ठराव पूर्णपणे ‘बनावट आणि खोटे’ असल्याचे सिद्ध झाले आहे.

शासकीय अभिलेखात फेरफार करून जिल्हा प्रशासनाची फसवणूक करणे हा 'भारतीय न्याय संहिता' अंतर्गत गंभीर अजामीनपात्र गुन्हा आहे. त्यामुळे ही योजना तातडीने रद्द करून दोषींना गजाआड करावे, अशी आक्रमक मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर उपनगराध्यक्ष शालिनी संजय सुखधान, गटनेते जितेंद्र कुऱ्हे, नगरसेविका जयश्री चंद्रकांत शिंदे, नगरसेवक संभाजी धोत्रे, नगरसेवक सागर मापारी, नगरसेविका इलयात खान पठाण, नगरसेविका सोनल राहुल चव्हाण, नगरसेविका नुसरीन मुमताज शेख, नगरसेविका शोभा प्रताप व्यवहारे, नगरसेविका प्रतिभा जालिंदर गवळी तसेच स्वीकृत नगरसेवक राजेंद्र काळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता यावर जिल्हाधिकारी काय ॲक्शन घेतात, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# श्रीरामपूर - कोकरे व नाऊरचे ग्रामस्थ पोहचले, थेट नाशिक आयुक्तालयाच्या दालनात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : वाळू उपसासाठी नदीत माती टाकून केलेल्या रस्त्यामुळे नदीचा प्रवाह बंद होऊन गावाला पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागेल, असा प्रचंड आक्षेप ग्रामस्थांनी नोंदविला.

या तीव्र घटनेबाबत श्रीरामपूर तालुक्यातील रामपूर-कोकरे आणि नाऊर येथील ग्रामस्थांनी वाळू उपश्यासाठी तीव्र विरोध केल्याने वाळूतस्करानी महिलांवर दगडफेकीची कथित घटना समोर आली होती. दरम्यान, बुधवारी दुपारी नाशिक येथे महसूल आयुक्त डॉ.प्रविण गेडाम यांची भेट घेऊन ग्रामस्थांनी निवेदन सादर केले.रामपूर- कोकरे परिसरातील गोदावरी नदीपात्रातील वाळूपट्ट्याच्या लिलावाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र आक्रमक भूमिका घेतली आहे.

गावातील महिलांवर झालेल्या कथित दगडफेकीच्या घटनेमुळे रामपूर व नाऊर येथे झालेल्या विशेष ग्रामसभांमध्ये संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या आहे.महिलांनी रणरागिणीचा अवतार धारण करत वाळूचा रस्ता होऊ देणार नाही, तसेच नदीपात्रातील वाळूचा एक खडादेखील उचलू देणार नाही, असा निर्धार व्यक्त केला आहेत. रामपूर गाव येथे आयोजित विशेष ग्रामसभेला मोठ्या संख्येने महिला, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी महिलांनी आक्रमक भूमिका घेत वाळू उपसा व वाहतुकीला ठाम विरोध दर्शविला.परिसरातील शांतता, शेती व पाणीपुरवठा धोक्यात घालणाऱ्या वाळू उपशाविरोधात आता अहोरात्र जागता पहारा ठेवण्यात येईल, असा इशाराही ग्रामसभेतून देण्यात आला. ग्रामसभेनंतर महिलांनी ट्रॅक्टरमधून नाऊर गावाकडे मोर्चा काढत तेथेही विशेष ग्रामसभा घेण्यात आली होती.नाऊर ग्रामस्थांनीदेखील एकमुखाने वाळू उपशाला विरोध दर्शवत शासनाने संबंधित वाळूपट्ट्याचा लिलाव तात्काळ रद्द करावा, अशी मागणी केली. दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी गोदावरी नदी ही परिसराचा आत्मा आहे असे सांगत नदीपात्रातील वाळू संवर्धनासाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला.महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असताना प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला. याबाबत लवकर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला.

# विस्थापितांच्या यादीतून नाव वगळले,

## सरपंच कातोरे यांचे विरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील निमगाव (को) येथील मागासवर्गीय विस्थापिताचे नाव लाभार्थ्यांच्या यादीतून जाणीवपूर्वक वगळ्याच्या कारणावरून येथील सरपंच कैलास कातोरे यांचे विरोधात थेट जिल्हाधिकारी यांचे कडे तक्रार करण्यात आली आहे . याबाबत किशोर अशोक पठारे यांनी दिलेल्या तक्रारी अर्जात म्हटले आहे की, मौजे निमगाव को येथील चारी नं. ११ मधील अतिक्रमण यादीमध्ये माझे वडील कै. अशोक लहानू पठारे ग्रामपंचायत मिळकत क्र.७१५ मध्ये पूर्वापार नोंद असताना ग्रामपंचायत निमगाव कोहाळेचे सरपंच कैलास कातोरे यांनी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता, ग्रामसभेचा ठराव न घेता, सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता तसेच कोणताही अधिकृत पंचनामा न करता सदर नाव अतिक्रमण यादीतून कमी केलेले आहे. सदर कृती ही केवळ बेकायदेशीर नसून अनुसूचित जाती प्रवर्गातील व्यक्तीवर अन्याय व भेदभाव करणारी आहे. किशोर अशोक पठारे हे २२१ अनुसूचित जाती प्रवर्गातील आहे . किशोर पठारे यांचे नाव तात्काळ अतिक्रमण यादीमध्ये पुनः समाविष्ट करावे, ग्रामपंचायत स्तरावर झालेल्या नोंद बदलाची चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकारी व पदाधिकाऱ्यांवर अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात आली आहे .

# जोगेश्वरी माता मंदिरावर महंत उद्धव महाराजांच्या हस्ते कलशारोहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा बुद्रुक परिसरातील एस कॉर्नरजवळील जोगेश्वरी वस्ती येथे लोकवर्गणीतून उभारण्यात आलेल्या जोगेश्वरी माता व श्री कालभैरवनाथ मंदिरावर सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या हस्ते वेदमंत्रांच्या जयघोषात कलशारोहन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी संत-महंत व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

महंत उद्धव महाराज मंडलिक, विजय महाराज पवार व ज्ञानेश्वर महाराज पेचे यांच्या आगमनावेळी फटाक्यांची आतषबाजी करत स्वागत करण्यात आले. पुरातन व जागृत मानल्या जाणाऱ्या जोगेश्वरी माता आणि श्री कालभैरवनाथ मंदिराच्या कळसाचे विधिवत पूजन करून कलशारोहन करण्यात आले.

कार्यक्रमात महंत उद्धव महाराज यांचे संतपूजन उपसरपंच बाळकृष्ण जायगुडे, गोकुळ जायगुडे, रामचंद्र जायगुडे व जोगेश्वरी तरुण मंडळाच्या वतीने करण्यात आले. यावेळी मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयनदादा गडाख, माजी सरपंच प्रकाश सोनटक्के, अण्णाभाऊ पेचे, भानुदास रेडे, गोकुळ गावडे आदी उपस्थित होते.

प्रवचनात बोलताना महंत उद्धव महाराज म्हणाले, सागर मंथनातून निघालेल्या अमृताच्या रक्षणाची जबाबदारी भगवान विष्णूंनी जोगेश्वरी माता व श्री कालभैरवनाथ यांच्यावर सोपवली होती.





हे स्थान अत्यंत जागृत असून पूजा-अर्चनेतून परमात्म्याचे चैतन्य अनुभवता येते.

मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी योगदान देणाऱ्या दात्यांचा शाल, श्रीफळ व प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला. महाप्रसाद वाटपाने भक्तिमय वातावरणात सोहळ्याची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले तर बाबासाहेब डौले यांनी आभार मानले.

# लक्ष्मीनगरसह शहरातील अतिक्रमणे नियमाकुल : नगरसेविका वाकचौरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव शहरातील लक्ष्मीनगरसह इतर भागातील शासकीय जागेवर असलेली अतिक्रमणे नियमाकुल करून शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरिकांना त्यांच्या नावचे उतारे मिळावे यासाठी मागील सहा वर्षापासून आमदार आशुतोष काळे यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे या प्रयत्नातून लवकरच कोपरगाव शहारातील लक्ष्मीनगरसह शहराच्या इतर भागातल अतिक्रमणे नियमाकुल करण्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका माधवी वाकचौरे यांनी म्हटले आहे. कोपरगाव शहरातील कोपरगाव नगरपरिषद हद्दीतील लक्ष्मीनगर भागातील शासकीय जागेवर मागील अनेक वर्षापासून नागरिक वास्तव्य करीत असून हे नागरिक राहत असलेली जागा नियमानुकूल करून त्यांना त्यांच्या नावचे उतारे मिळावे हा प्रश्न मागील काही वर्षापासून प्रलंबित होता. परंतु २०१९ पासून आमदार आशुतोष काळे यांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक पावले उचलण्यास सुरुवात केली. त्यांच्या सूचनेनुसार लक्ष्मीनगर भागातील शासकीय जागेवर असलेली अतिक्रमणे नियमाकुल करून त्याबाबतचे आवश्यक असणारे कागदपत्रे लवकरात लवकर जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवून त्या शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरिकांना उतारे मिळावे यासाठी कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाने शीघ्र गतीने प्रयत्न करावे अशी मागणी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी २९ नोव्हेंबर २०१९ च्या सर्वसाधारण सभेत केली होती. त्यानंतर ५ फेब्रुवारी २०२० मध्ये आमदार आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेवून लक्ष्मीनगर मधील शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागा शासकीय नियमाप्रमाणे नियमित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करून हे प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवावे. शासकीय जागेवर राहत असलेल्या नागरिकांना त्यांच्या जागेचे उतारे लवकरात कसे मिळतील यासाठी प्रयत्न करावे अशा सूचना दिल्या होत्या. या बैठकीमध्ये कोपरगाव शहराच्या इतर भागातील शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमाकुल करण्याबाबतही महत्वाची चर्चा करण्यात आली होती.

त्यानंतर या जागा नियमानुकूल करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी नगररचना, मूल्यनिर्धारण विभागाचे संचालक सुधाकर नांगनोरे यांची भेट घेवून जागा नियमानुकूल करण्याबाबत सकारात्मक चर्चा करून सहकार्य करण्याची विनंती करून त्यांना निवेदन दिले होते. या नागरिकांच्या जागा शासन नियमानुसार नियमित करण्यासाठी आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवकांनी सातत्याने कोपरगाव नगरपरिषदेकडे पाठपुरावा करून वेळोवेळी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत देखील या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधण्याचे काम केले आहे. लक्ष्मीनगर प्रमाणेच कोपरगाव शहरातील टाकळी नाका, साईनाथ नगर, सुभाष नगर भाग -१, सुभाषनगर भाग-२, संजयनगर भाग-१, संजयनगर भाग -२, लक्ष्मीनगर , टिळक नगर, गोरोबा नगर, गजानन नगर, महादेव नगर भाग-१, महादेव नगर भाग-२, लिंभारा मैदान, जिजामाता उद्यान, खडकी, गांधी नगर भाग-१, गांधी नगर भाग -२,दत्तनगर, बेट भागातील २० कुटुंब व हनुमान नगर आदी भागात मागील अनेक वर्षापासून हे कुटुंब शासकीय जागेवर राहत आहे. त्या नागरिकांची शासकीय जागेवरील अतिक्रमणे लवकरात लवकर नियमाकुल करण्यासाठी आमदार आशुतोष काळे अथकपणे पाठपुरावा करीत आहे. त्यामुळे लवकरच हा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका माधवी वाकचौरे यांनी म्हटले आहे.



# श्रीरामपूरात मध्यरात्री घरात धुडगूस, महिलेला मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील म्हाडा कॉलनीत राहणाऱ्या पती पत्नीस मारहाण करून घरातील वस्तूंची तोडफोड करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. याप्रकरणी सोनाली काकासाहेब दिवे (वय-३५, रा. म्हाडा कॉलनी, वार्ड नं. ७, श्रीरामपूर) या महिलेने राहुरी पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून आठ ते नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहेत. फिर्यादीत म्हटले आहे की, आपले पती काकासाहेब शंकर दिवे चालक म्हणून काम करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सोमवारी दि. १८ मे २०२६ रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास पती रिक्षा चालवुन घरी आले असता म्हाडा कॉलनीचे पाठीमागे अंकुश जेधे, विकास जगधने, रुद्र जगधने व सोबत असलेले सहा ते सात जणांनी त्यांना शिवीगाळ केली. परंतु ते तेथे न थांबता घरी निघुन आले.त्यानंतर जेवण करून आम्ही घराचे खाली गेले असता अंकुश जेधे, विकास जगधने, रुद्र जगधने व त्याचे सोबत असलेले सहा ते सात इसमांनी घरात प्रवेश केला. त्यांना थांबविले असता त्यांनी मला ढकलून दिल. त्यानंतर सर्वांनी काठी, लोखंडी रॉडने घरातील गृह उपयोगी वस्तू फ्रिज, कुलर, मिक्सर, टीव्ही व इतर वस्तू फोडण्यास सुरुवात केली. याबाबत त्यांना विचारले असता त्यांनी मला शिवीगाळ करुन तुझा नवरा माजला आहे,असे म्हणाले. त्यावेळी त्यांनी गावठी कटयासारखे हत्यार दाखवत जिवे ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी आरोपींनी आरडओरड करत शिवीगाळ व मारहाण केली. तसेच गळयातील दोन ग्रॅम बजनाची सोन्याची पोत ओरबाडली. तमेच घरात कुलरवर ठेवलेले पतीचे ७००० रु व लायसन्स, आधारकार्ड, पॅनकार्ड, ओळखपत्र असलेले पाकीट चोरुन नेले. यावेळी त्यांनी घरातील असलेल्या चाव्याचा जुडगा सोबत नेला.आपण आरडाओरडा केला असता पळुन जाताना तुम्ही श्रीरामपुर पोलीस स्टेशनला गेले तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. त्यामुळे भीतीपोटी आपण श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार न देता राहरी पोलीस स्टेशनला तक्रार दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्हा श्रीरामपूर शहर पोलिसांत वर्ग करण्यात आला आहे.आरोपींकडून जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने पीडित महिलेला श्रीरामपूरऐवजी थेट राहुरी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करावी,

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### आश्वी खुर्द येथे प्रवरेच्या कृषीदूतांचे आगमन



**लोणी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथे कृषी महाविद्यालय ,लोणी येथील कृषीदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीदूतांचे स्वागत केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषीदूत येथील शेतकऱ्यांना सदर कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी ग्रामीण जीवन आणि कृषी तंत्रज्ञान, कीड व रोग ओळख, एकात्मिक व्यवस्थापन यांची माहिती शेतकऱ्यांनपर्यंत प्रात्यक्षिकाद्वारे पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे.

### महाराजस्व समाधान शिबिर यशस्वी



**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या भैरवनाथनगर ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत भैरवनाथनगर व श्रीरामपूर महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर मा.आ.भाऊसाहेब कांबळे, तहसिलदार मिलिंदकुमार वाघ, नगर सेविका वैशाली चव्हाण, लोकनियुक्त सरपंच दिपालीताई फरगडे, उपसरपंच चंद्रभागा काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आले. भैरवनाथनगर येथील डावखर लॉन्स, पुणतांबा रोड, भैरवनाथनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महसूल संबधित सर्व सेवांचे पूर्व नियोजन करण्यात आलेले होते. या शिबिरामध्ये नवीन रेशनकार्ड, विभक्त रेशन कार्ड, उत्पन्न दाखले, संजय गांधी निराधार योजना, अँग्रीस्टँक योजना, विद्यार्थ्यांसाठी शालेय दाखले व इतर शासकीय दाखले वितरीत करण्यात आले.

### कांगोणी येथे जागतिक मधमाशी दिन उत्साहात

**सोनई** – कांगोणी ता. नेवासा येथील खंडोबा मंदिर परिसरात जागतिक मधमाशी दिन कृषी महाविद्यालय सोनईच्या कृषिकन्यांद्वारे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी कृषी महाविद्यालय सोनईच्या कृषिकन्यांनी शेतकऱ्यांना मधमाश्यांचे संगोपन व संवर्धनाबद्दल माहिती दिली. यामध्ये वेदश्री गोडसे हीने सूत्रसंचालन केले. तसेच प्रांजली हंगे, धनश्री घुटे, भाग्यश्री लंघे यांनी मधमाशांचे पर्यावरणातील महत्त्व, परागीभवनातील त्यांचे योगदान व त्यांच्या संरक्षणाबाबत माहिती दिली.मधमाश्यांचे संरक्षण करण्यासाठी सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे, कीटकनाशकांचा वापर टाळणे आणि जास्तीत जास्त फुलांची झाडे लावणे अत्यंत गरजेचे आहे, असे यावेळी विद्यार्थिनींनी सांगितले. सोमनाथ कराळे यांनी कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने विद्यार्थिनींचे आभार मानले. कार्यक्रमाअंती सुहानी गोसावी हिने कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी कृषी महाविद्यालय सोनईचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य सुनील बोरुडे व इतर प्राध्यापक वर्ग यांचे मार्गदर्शन लाभले.

# तरुणांना रोजगार देण्यासाठी महायुती युवासेना कटिबद्ध : आ. खताळ

## संगमनेरला युवासेनेच्या रोजगार तरुण-तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण संगमनेरला एमआयडीसी सुरू करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री उदय सामंत, आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला असून एमआयडी ०सीला मंजुरी मिळाली आहे लवकरच एम आय डीसी बाबतचे नोटिफिकेशन निघणार असून तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महायुती व युवासेना कटिबद्ध असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले. संगमनेर शहरात युवासेनेच्या माध्यमातून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



त्यावेळी तरुणांना मार्गदर्शन करताना आमदार खताळ बोलत होते यावेळी व्यासपीठावर युवासेनेचे जिल्हाप्रमुख शुभम वाघ, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य दादाभाऊ गुंजाळ, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे, उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, मंजाबापू साळवे, शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, महिला उपजिल्हा प्रमुख दिपाली वावळ, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, युवासेना उपजिल्हा प्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, शहरप्रमुख सार्थक शेवाळे, डॉ अमोल कर्पे, आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान या रोजगार मेळाव्यासाठी ६०० तरुण-तरुणींनी मुलाखती दिल्या त्यापैकी १२५ तरुणी तरुणींनी तरुणीची प्राथमिक निवड करण्यात आली तर काहींना जागेवर ऑफर लेटर देखील देण्यात आले. आमदार खताळ म्हणाले की, संगमनेरमधील तरुणांना त्यांच्या शिक्षणानुसार आणि कौशल्यानुसार नोकरी मिळावी, यासाठी शिवसेना युवासेना कटिबद्ध आहे . ग्रामीण भागातील तरुणांनाही रोजगाराच्या संधी मिळावी या उद्देशाने पारेगाव येथे नव्याने सुरू झालेल्या उद्योगात सुमारे ६०० ते६५० युवकांना रोजगार देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संगमनेरमधील उद्योजकांनीही पुढाकार घेत स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.या रोजगार प्रक्रियेसाठी तब्बल १ हजार ,८०० युवकांनी नोंदणी केली. त्यापैकी अनेकांनी ऑनलाइन अर्ज सादर केले.

बीएससी, एमएससी, बीसीए, आयटीआय तसेच इतर विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या युवकां साठी लहान-मोठ्या स्वरूपाच्या नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. प्रत्येकाने केवळ नोकरीच करावी असे नाही, तर काही तरुणांनी उद्योजक बनून इतरांना रोजगार द्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सहकारी औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून इच्छुक तरुणांना उद्योग क्षेत्रात उतरता यावे, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनात कौशल्याधारित रोजगाराला प्रोत्साहन दिले जात आहे आय टी आय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना विशेष संधी उपलब्ध होत असल्याचेही आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

## वडाळा बहिरोबा ग्रामपंचायतच्यावतीने विविध विकास कामांचा शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील वडाळा बहिरोबा येथील मुख्य बाजार तळ परिसर कंपाऊंड व भोजणे वस्ती ते बाजारतळ पाणीटाकी पर्यंत पाईप लाईन कामाचा शुभारंभ सरपंच ललित भाऊ मोटे पाटील व सर्व पदाधिकारी ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आला.

वडाळा बहीरोबा येथे होणाऱ्या विकास कामांमुळे माता-भगिनींची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवणार असून नवीन पाईपलाईन आणि बाजार तळ जागेचे संरक्षण करणारे कंपाऊंड होणार आहे. व्यापारी आणि नागरिकांना मूलभूत सुविधा देणे आमचे कर्तव्य आहे.ही विकासकामे फक्त कागदावर न राहता प्रत्यक्ष जमिनीवर उतरत आहेत याचा मला सार्थ अभिमान आहे. या दोन्ही कामांचा दर्जा उत्तम राखला जाईल. कामात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. असे मनोगत लोकनियुक्त सरपंच ललित मोटे यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक भाऊसाहेब मोटे, माजी उपसरपंच सचिन मोटे, बाबासाहेब मोटे, निखिल मोटे, लहू मोटे, बाळासाहेब जामकर, प्रतीक मोटे, बंडू मोटे,ज्येष्ठ नागरिक काशिनाथ मोटे, सदू मोटे, दादासाहेब मोटे प्रशांत मोटे,रोहिदास मोटे,अरुण राऊत,सुनील पतंगे, भास्कर जामकर,अजित पवार ग्रामपंचायत कर्मचारी विशाल मोटे राजेंद्र मोटे मनोहर लवांडे अर्जुन कुऱ्हाडे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

## डिझेल टंचाई आणि कांद्याला भाव नसल्याने शेतकरी दुहेरी संकटात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी, चनेगाव, दाढ खुर्द, पिंपरी लौकी, पानोडी, शिबलपूर आदी परिसरात डिझेल टंचाई आणि कांद्याला मिळत नसलेला दर यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. शेतीच्या महत्त्वाच्या हंगामात इंधनाअभावी मशागत आणि पेरणीपूर्व कामांवर परिणाम होत असल्याने शेतकरी वर्गात चिंता व्यक्त केली जात आहे.

पावसाच्या पार्श्वभूमीवर नांगरट, मशागत आणि पेरणीपूर्व तयारीची लगबग सुरू असताना ट्रॅक्टरसाठी आवश्यक डिझेल उपलब्ध होत नसल्याने अनेक ठिकाणी शेतीची कामे ठप्प होण्याची वेळ आली आहे. पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी मोठ्या रांगा लागत असून वेळेवर इंधन न मिळाल्याने शेतकऱ्यांचे नियोजन विस्कळीत होत आहे. काही ठिकाणी ट्रॅक्टर उभे ठेवावे लागत असल्याने आगामी पेरणीवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे कांद्याला उत्पादन खर्चही निघणार नाही, असा अत्यल्प बाजारभाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. खत, बियाणे, औषधे, मजुरी आणि इतर खर्च सातत्याने वाढत असताना शेतीमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. शेती करायची तरी कशी आणि जगायचं तरी कसं? असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.

## नगरपालिकेच्या वसुलीत अनागोंदी

### चुकीच्या बिलांमुळे नागरिक त्रस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर नगरपालिकेच्या वसुली विभागाच्या अनागोंदी कारभारामुळे शहरातील नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा आरोप भाजपच्या नगरसेविका स्नेहल केतन खोरे यांनी केला आहे. घरपट्टी व पाणीपट्टीची चुकीची बिले तात्काळ वाटप करणे बंद करावे, अन्यथा प्रशासनाला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

नगरपालिकेकडून नुकतेच शहरात घरपट्टी व पाणीपट्टी बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. मात्र, अनेक नागरिकांनी मार्च अखेरपर्यंत सर्व कर भरलेले असतानाही त्यांच्या नावावर थकबाकी दाखविणारी बिले देण्यात आल्याचे समोर आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही नागरिकांनी याबाबत तक्रारी केल्यानंतर नगरसेविका स्नेहल खोरे यांनी वसुली विभाग प्रमुखांशी संपर्क साधला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक अडचण आहे असे सांगत उडवाउडवीची उत्तरे दिल्याचा आरोप खोरे यांनी केला.

प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागत असल्याने चुकीच्या बिलांचे वाटप त्वरित थांबवून दुरुस्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## टाकळीभान येथे शिवरायांचा पुतळा काढण्यावरून तणाव

### प्रशासनाकडून एक महिन्याची मुदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे बस स्टँड परिसरातील अश्वारूढ पुतळा काढण्यासाठी प्रशासनातून हालचाली झाल्याने गावात काही काळ तणाव निर्माण झाला होता अखेर प्रशासन व ग्रामस्थांची बैठक होऊन त्यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांना संपर्क होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा काढण्याची मुदत एक महिन्याची देण्यात आली असून एक महिन्याच्या आत कायदेशीर कागदपत्राची रीतसर परवानगी घेऊनच चांगल्या प्रतीचा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसवण्यात यावा व तोपर्यंत पुतळा झाकून ठेवण्यात यावा असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून ग्रामस्थांना करण्यात आले.



टाकळीभान येथे छत्रपती शिवरायांचा मोठा अश्वारूढ पुतळा व्हावा अशी ग्रामस्थांची बऱ्याच वर्षापासून इच्छा होती. ६ मार्च २०२६ रोजी छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा विना परवानगी स्टँड परिसरामध्ये ग्रामस्थांच्या वतीने बसवण्यात आला. शासनास सदर माहिती मिळताच पुतळा काढण्यासंदर्भात ग्रामस्थांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु यासंदर्भात पोलीस प्रशासनाकडून कालपासूनच रात्री बारा वाजेपासून पोलीस फौज फाटा टाकळीभान येथे दाखल होऊन छावणीचे स्वरूप प्राप्त होऊन पुतळ्या काढण्यासंदर्भात हालचाली सुरू होत्या. त्या पार्श्वभूमीवर अचानकपणे ग्रामस्थांनी सकाळी गाव बंदचे अवाहन केले होते. व त्याप्रमाणे व्यापारी व ग्रामस्थांनी स्वतःहून स्वयंस्फूर्तीने गाव बंद ठेवले होते. परंतु काल सकाळी पोलीस स्टेशन समोर वरिष्ठ पोलीस अधिकारी,प्रशासन, महसूल व बांधकाम अधिकारी व ग्रामस्थांची बैठक झाली. यातून सर्व प्रशासनाचे अधिकारी व ग्रामस्थां मध्ये या संदर्भात चर्चा होऊन, यावेळी श्रीरामपूर तालुका पोलीस उपविभागीय अधिकारी जयदत्त भवर व पोलीस निरीक्षक अरुण धनवडे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीद्वारे येथील ग्रामस्थांच्या भावना कळविल्या व वरिष्ठांनी पुतळ्यास लागणाऱ्या कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी एक महिन्याची मुदत दिली. परंतु तोपर्यंत पुतळा झाकून ठेवण्याचे आदेश पोलिस प्रशासनाच्या वतीने देण्यात आले. यावेळी ग्रामस्थां कडून आरती करून पुतळा झाकण्यात आला. पोलीस प्रशासनाच्या प्रशासनाकडून आश्वासनामुळे गाव पूर्ववत सुरू झाले व एक महिन्याची छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी मुदत वाढ मिळाली म्हणून शिवप्रेमींना तूर्तास दिलासा मिळाला.

## अहिल्यानगर उत्तर काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी सचिन गुजर



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : संघटन सृजन अभियान अंतर्गत निरीक्षकांनी महाराष्ट्रातील जिल्हा जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष भेटी घेऊन काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून दिलेल्या अहवालाला काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मान्यता दिली असून त्यानुसार उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी सचिन गुजर यांची निवड झाली आहे त्याबाबत नुकतेच काल पत्र प्रसिद्ध झाले आहे.

सचिन गुजर यांची तिसरी पिढी सध्या काँग्रेसमध्ये कार्यरत आहे संघटन कौशल्य, वकृत्व आणि पक्ष वाढीसाठी असलेली तळमळ हे सगळे गुण लक्षात घेता सचिन गुजर यांची जिल्हाध्यक्षपदी आठ महिन्यात दुसऱ्यांदा निवड झाली आहे. यापूर्वी सचिन गुजर यांनी युवक काँग्रेसचे अध्यक्ष, तालुकाध्यक्ष जिल्हा कार्याध्यक्ष, मुळा प्रवरा वीज संस्थेचे व्हाइस चेअरमन, मार्केट कमिटीचे सभापती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेचे विश्वस्त म्हणून अशा महत्वपूर्ण पदांवर काम केले आहे काम करताना त्यांनी आपल्या कामाचा ठसा हा उमटवला आहे.

## 'जनगणना' कामाची बनकर यांच्याकडून 'ग्राऊंड'वर पाहणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचे जनगणना निरीक्षक श्रीकांत बनकर यांनी बुधवारी (दि. २०) श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण भागात भेट देऊन, 'जनगणना २०२६' अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घर गणना कामाचे प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. यावेळी त्यांनी ग्राउंडवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेत त्यांचे जागेवरच निरसन केल्याने प्रगणक, पर्यवेक्षक आणि महसूल वर्तुळात प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



**जनतेने सकारात्मक प्रतिसाद द्यावा**

जनगणना हे देशहिताचे आणि अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. या राष्ट्रीय कामासाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्ण ताकदीने मैदानावर उतरली आहे. नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना अचूक माहिती देऊन या मोहिमेत प्रशासनाला सकारात्मक प्रतिसाद व सहकार्य करावे, जेणेकरून राष्ट्रीय नियोजनाला गती मिळेल.

**-मिलिंदकुमार वाघ, तहसीलदार, श्रीरामपूर.**

निरीक्षणादरम्यान श्रीकांत बनकर यांनी प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन प्रगणक व पर्यवेक्षक व व्यावहारिक विषयांवर यांच्याशी विविध तांत्रिक सविस्तर चर्चा केली. प्रत्यक्ष काम करताना येणारे अडथळे आणि त्यावर करायच्या उपाययोजनांबाबत त्यांनी कर्मचाऱ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. या प्रसंगी नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, सहाय्यक महसूल अधिकारी निलेश इंगळे तसेच तांत्रिक सहाय्यक राजेश कवाने प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रांताधिकारी किरण सावंत पाटील व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या अचूक नियोजन व मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर ग्रामीण भागात 'घर गणना' या पहिल्या टप्प्याने कमालीचा वेग घेतला आहे. महसूल विभागाची संपूर्ण यंत्रणा सध्या या राष्ट्रीय कामासाठी युद्धपातळीवर कार्यरत आहे.


**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर यांचे कार्यालय**

ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

दुरध्वनी क्रमाक :- (२४२५) २२५३५३

क्र. कावि / जन्म नोंद /२१९/२०२६ संगमनेर दि. २०/०५/२०२६

**जाहिरनामा**

याव्दारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार जगदाळे रेखा बाळु रा. पारेगाव बु।। ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दि. १८/०५/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले.

अर्जदार हे रा. पारेगाव बु।। ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथिल रहीवासी असुन त्यांचा जन्म रा. पारेगाव बु।। ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे दि.३०/०३/१९९१ रोजी झालेला असुन, त्यांचे जन्माची नोंद पारेगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे नोंद उपलब्ध नसल्याने त्या बाबत जन्माची नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तीला तक्रार/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पारेगाव ता. संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द झाले पासुन ३० दिवसाचे आत सुटटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकत / तक्रार दाखल करावी. मुदतीनंतर त्या हरकती / तक्रारीचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**तहसीलदार संगमनेर**


## राधाकृष्ण महाराजांच्या भागवत कथेस शोभायात्राने प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : त्रैवार्षिक पुरुषोत्तम मासानिमित्त नेवासा तालुक्यातील श्री गुरूदेव दत्त पीठ क्षेत्र देवगड येथे राजस्थान जोधपूर येथील गोवत्स राधाकृष्ण महाराज यांच्या श्रीमद भागवत कथा सोहळयाला भागवत ग्रंथ शोभायात्रा मिरवणूकीने व गोमातेच्या पूजनाने प्रारंभ करण्यात आला. यावेळी टाळ मृदुंगाच्या गजरात व भगवान दत्तात्रयांच्या नामघोषाने झालेल्या शोभायात्रा मिरवणुक प्रसंगी देवगडनगरी दुमदुमली होती.



(छाया/सुधीर.चव्हाण)

पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने आयोजित श्रीमद भागवत कथा व किर्तन सोहळयाला विठ्ठल भक्तीरस महोत्सव असे नाव देण्यात आले आहे. देवगड येथील प्रांगणातून टाळ मृदुंगाच्या गजरात गुरुवारी शोभायात्रा मिरवणुकीला प्रारंभ झाला मिरवणुकीत गोवत्स राधाकृष्ण महाराज, देवगड दत्त पिठाचे प्रमुख महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज, उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या समवेत वारकरी संप्रदायातील संत महंत कीर्तनकार प्रवचनकार पुरुष व महिला भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**विठ्ठल माझा माझा,माझा, माझा.. माझा, विठ्ठल माझा, मी विठ्ठलाचा.!**

या भक्तीगीतांनी देवगड येथे याआधी झालेल्या राधाकृष्ण महाराज यांच्या कथेप्रसंगी वेड लावले होते. आता पुन्हा अनेक वर्षांनी ही धून भाविकांच्या कानावर पडताच भाविक तल्लीन झालेले दिसत होते.

निघालेल्या शोभायात्रेच्या प्रसंगी गो शाळेतील गोमतेचे तसेच गंगा पात्रात जाऊन गंगेचे पूजन गोवत्स राधाकृष्ण महाराज, गुरुवर्य भास्करगिरी महाराज स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भगवान दत्तात्रय व श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या समाधी मंदिरात जाऊन मूर्तींचे पूजन करण्यात आले. कथा सुरू असलेल्या ज्ञानसागर सभामंडपात शोभायात्रा मिरवणूकीचा समारोप करण्यात आला.यावेळी भास्करगिरी महाराज म्हणाले की पुरुषोत्तम मासाच्या पवित्र पर्व काळात राधाकृष्णजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद भागवत कथा श्रवणाची पर्वणी आपल्याला पुन्हा प्राप्त झाली आहे,राधा हे भक्तीचे तर कृष्ण हे ज्ञानाचे प्रतीक असल्याने हया दोन्हीही गोष्टी आपल्याला श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या कथा सोहळयाच्या माध्यमातून भक्तीचे पूर्णत्व प्राप्त होणार आहे.

कथेच्या शुभारंभ प्रसंगी शेणाने सारवलेले मॅट आकर्षक रांगोळया, पुरातन काळातील कंदील, तांबे पितळाचे हांडे,चटईची कुटीया या पद्धतीने सजवलेले कथा व्यासपीठ,कथेच्या मागे पंढरीच्या पांडुरंगाची संतांना खांद्यावर घेतलेली प्रतिमा सर्वांचेच आकर्षण ठरले होते कथा सोहळयाच्या प्रारंभीच वारकरी संप्रदायातील संत महंत मंडळी यांच्यासह युवक बालबालिका, महिला पुरुष भाविकांनी मोठी गर्दी केली होती.


**जाहीर नोटीस**

जन्म मृत्यु अर्ज नं. /२०२६

**श्री. अमिर बादशाह शेख रा शिर्डी**

ता.राहाता, जि. अहिल्यानगर - **अर्जदार**

**विरुध्द**

**१. जन्म मृत्यु नोंद निबंधक-** शिर्डी ता राहाता जि.अहिल्यानगर

अर्जः- जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये ज्या अर्थी अर्जदार हे नमुद पत्त्यावर राहाता असुन अर्जदार श्री. अमिर बादशाह शेख रा शिर्डी ता राहाता जि. अहिल्यानगर यांचा दिनांक ०१/०१/१९६२ रोजी शिर्डी ता राहाता जि.अहिल्यानगर येथे जन्म झालेला आहे. त्यांची जन्माची नोंद कोठेही झालेली नाही. अर्जदार यांना माहिती नसल्याने तसेच त्यांना जन्माची नोंद करणे विषयी कोणतीही माहिती नसल्याने जन्माची नोंद करावयाचे राहुन गेलेले आहे. अर्जदारांना सदर जन्माचे दाखल्याची गरज असल्याने त्यांनी जन्म- मृत्यु नोंद निबंधक शिर्डी ता राहाता जि. अहिल्यानगर येथे अर्जदार श्री. अमिर बादशाह शेख रा शिर्डी ता राहाता जि. अहिल्यानगर यांचे जन्माचे दाखल्या संबंधाने चौकशी केली असता जन्माची नोंद आढळुन येत नसल्याबाबतचे जन्माची नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र जन्म मृत्यु नोंद निबंधक-शिर्डी ता राहाता जि. अहिल्यानगर यांनी दिले व जन्माच्या दाखल्यासाठी मा. तहसिलदार यांचे कडुन योग्य तो आदेश आणण्यास सांगितले. त्या करीता सदरचा अर्ज केलेला आहे. त्या अर्थी अर्जदार श्री. अमिर बादशाह शेख रा. शिर्डी ता. राहाता जि. अहिल्यानगर यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९६२ रोजी शिर्डी ता राहाता.जि. अहिल्यानगर येथे झाला असुन जन्म तारखेबाबत कुणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी तहसिल कार्यालय राहाता व ग्रामपंचायत कार्यालय भगवतीपूर येथे जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत सकाळी ११.०० वाजता लेखी हरकत व कागदपत्रांसह तहसिल कार्यालय राहाता येथे हजर राहावे अन्यथा कुणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन श्री. अमिर बादशाह शेख रा शिर्डी ता राहाता जि. अहिल्यानगर येथुन जन्म तारखेचा ०१/०१/१९६२ जन्म दाखला देण्यात येईल, ही जाहीर नोटीस दिली असे. आज रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले असे.

स्थळ- राहाता

दिनांक- / /२०२६

शिक्का

तहसीलदार,
राहाता



**जाहिर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः नेवासा तालुक्यातील लोकांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल ज्ञानेश्वर मुरलीधर काळे, रा. वाळुंज, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे गोगलगांव, ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील गट नं. १५६ पैकी योहान गेणु खंडागळे यांच्या नावावरील ०० हे ८० आर क्षेत्र व कांताबाई योहान खंडागळे यांच्या नावावरील ०० हे ७१ आर क्षेत्र या क्षेत्राचा कायमस्वरुपी खरेदी खताने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व खरेदी घेणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री करारनामा, मृत्यूपत्र, लिज, साठेखत, भाडेपट्टा, इत्यादी स्वरुपाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार असल्यास त्वरीत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आमचे अशिलाशी कागदपत्र घेवुन संपर्क साधावा. १५ दिवसाच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार न आल्यास आमचे अशिल सदरची मिळकत ही निर्वेध व निंजोखमी असे समजुन सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार, हरकत ऐकुन घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली असे.

नेवासा, दिनांक :-२१/०५/२०२६

ज्ञानेश्वर मुरलीधर काळे

मोबा नं. ९८२३७६२०१३

**ॲड-मुंगसे आर.एम.**

नेवासा ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

मो. नं. ९८९०७४८७७२

# पान १ वरुन

## महाराष्ट्रावर 'अल निनो'चे संकट

पिकांवर परिणाम होतो. त्यामुळेच जलयुक्त शिवारचे कामे वेगाने करण्याचे आदेश दिले आहेत. ज्यातून पडलेला पावसाचे पाणी आपण जरी थांबवू शकलो तर किमान प्रोटेक्टिवर इरिगेशन करता येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. गेल्या काही वर्षातील अल निनोची जे वर्ष आहेत त्यापैकी २०१५ चे वर्ष खूप कठीण होतं. त्या वर्षी मराठवाड्यात ६१ टक्केच पाऊस पडला होता. अशा प्रकारची परिस्थिती आली तर काय करायला पाहिजे याबाबत प्रत्येक जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत, असं देखील मुख्यमंत्र्यांनी दिलं.

## संदीप रोडे यांना महिलांकडून कपडे फाडून मारहाण

क्लिप शोशल मीडियावर व्हायरल झाल्या आहेत. मात्र त्यावेळी रोडे यांनी काहीही करा, माझ्याकडे पैसे नाहीत; मी कायदेशीर मार्गाने लढतोय, असे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतप्त गुंतवणूकदारांनी त्यांचे काहीही ऐकून घेण्यास नकार दिल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.या घटनेनंतर सिस पे गुंतवणूकदारांचा फैसला आता कायद्याच्या कचाट्यात नसून जनतेच्या कचाट्यात गेला आहे, अशी चर्चा शहरात उघडपणे सुरू झाली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे तालुक्यातील नागरिकांच्या भावना तीव्र झाल्या असून, गुंतवणूकदारांमध्ये मोठा रोष निर्माण झाला आहे. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पोलिस प्रशासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

## २५ हजारांची लाच घेताना विशेष सहाय्यक सरकारी वकील रंगेहात अटक

तक्रार नोंदवली. या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता, पुरंदरे यांनी लाच मागितल्याचे निष्पन्न झाले होते. त्याच अनुषंगाने गुरुवार २१ मे रोजी दुपारच्या सुमारास एसीबीने वसई न्यायालय परिसरात सापळा रचला. दुपारी साडेबारा वाजता, वसई न्यायालयाच्या तळमजल्यावरील सरकारी वकील यांच्या शासकीय कक्षातच आरोपी भुपेश पुरंदरे यांनी तक्रारदाराकडून २५ हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारली. पैसे स्वीकारताच दबा धरून बसलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने झडप घालून पुरंदरे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेतले.या प्रकरणी वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## विधान परिषदेसाठी महायुतीत तिढा

गेल्या वेळी नाशिकमधून शिवसेनेचे आमदार निवडून आले होते याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. कोकणातील रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघाकरिता तिन्ही पक्ष इच्छुक आहेत. गेल्या वेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे हे निवडून आले होते. यामुळे ही जागा राष्ट्रवादीकडेच कायम राहावी, अशी तटकरे यांची भूमिका आहे. कोकणात सर्वाधिक सदस्य निवडून आले असल्याचे या जागेवर शिंदे गटाचा दावा आहे. रायगडवर वर्चस्व असल्याने ही जागा राष्ट्रवादीकडे आहे. परंतु, या ठिकाणी शिवसेनेनेही हातपाय पसरले आहे.गेल्या वेळी रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग हे तीन मतदारसंघ एकत्रित राष्ट्रवादीने जिंकले होते. यामुळ हे तिन्ही मतदारसंघ आमच्याकडे कायम राहावेत, त्याशिवाय पुणे व अहिल्यानगर हे राष्ट्रवादीचे हक्काचे मतदारसंघ आहेत, अशी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची भूमिका आहे.

# पेट्रोल पंप चालकाची मनमानी; ''ऑईल घ्या तरच डिझेल मिळेल''

### पाराळा येथील केएसके पेट्रोल पंपावर शेतकऱ्यांचा संताप; तहसीलदारांच्या हस्तक्षेपानंतर डिझेल वाटप सुरळीत.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर:** खरीप हंगाम तोंडावर आला असताना डिझेलसाठी शेतकऱ्यांची अक्षरशः फरफट सुरू असून वैजापूर तालुक्यातील पाराळा येथील केएसके पेट्रोल पंपावर चालकाच्या मनमानी कारभारामुळे शेतकरी व नागरिक संतप्त झाले आहेत. दोन हजार रुपयांचे डिझेल घ्या आणि त्यावर साडेचारशे रुपयांचे ऑईल घ्या, तरच डिझेल मिळेल, अशी सक्ती करत चालकाने शेतकऱ्यांना वेठीस धरल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

डिझेलसाठी सकाळपासून रांगेत उभ्या असलेल्या शेतकऱ्यांना चालकाकडून उर्मट भाषा वापरत शिवीगाळ करण्यात आली. एवढेच नव्हे तर काहींना पंपाच्या बाहेर हाकलून देण्यापर्यंत मजल गेल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही दुपारी दोन वाजेपर्यंत पंप बंद ठेवण्यात आल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला. दरम्यान, एका शेतकऱ्याने वैजापूर येथील पुरवठा विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची गंभीर दखल घेत पुरवठा अधिकारी पी. के. काकडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र पंप चालकाने अधिकाऱ्यांनाही न जुमानता येथे कोणतेही कागदपत्र नाहीत, घरी चला सर्व दाखवतो, असे म्हणत अधिकाऱ्यांशीही वाद घातल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी संबंधित शेतकऱ्यावरच बोट दाखवत आरोप करण्याचाही प्रकार घडला. परिस्थिती चिघळत असल्याचे



लक्षात येताच शेतकरी संघटनेचे नेते दादासाहेब तांबे यांनी पंप चालकाला फैलावर घेत तात्काळ डिझेल वाटप सुरू करण्याची मागणी केली. जनक्रांती सेनेचे अजय पाटील यांनीही घटनास्थळी धाव घेत शेतकऱ्यांना पाठिंबा दिला. त्यानंतर काही प्रमाणात डिझेल वाटप सुरू करण्यात आले. सुविधांचा अभाव; शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचा आरोप संबंधित पेट्रोल पंपावर मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याचे नागरिकांनी सांगितले. शौचालयांची अत्यंत दुरवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे नसणे, डिझेल स्टॉकची स्पष्ट माहिती न देणे, तसेच वारंवार पंप बंद ठेवून शेतकऱ्यांना वेठीस धरणे, अशा प्रकारांमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. सेटिंग बदलून दिशाभूल करण्याचा प्रयत्न? दरम्यान, पंपावरील यंत्रणांची सेटिंग बदलून प्रशासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचीही चर्चा परिसरात रंगली होती. मात्र तहसीलदारांनी सावध भूमिका घेत थेट इंडियन ऑईल कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत परिस्थितीची माहिती घेतली. त्यांच्या हस्तक्षेपानंतर डिझेल वाटप सुरळीत करण्यात आले.

## गंगागिरी महाराज सप्ताहासाठी रस्ते तातडीने दुरुस्त करा : अभिजीत पोटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता** : राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या गंगागिरी महाराजांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी राज्यभरातून सुमारे एक कोटी भाविक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर धनगरवाडीला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व नव्याने बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी शिवसेना युवा नेते अभिजीत पोटे यांनी जिल्हाधिकारी व रस्ता सुरक्षा समितीकडे निवेदनाद्वारे केली आहे.

रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत यापूर्वी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याचे पोटे यांनी नमूद केले. २१ मे रोजी होणाऱ्या ऑनलाईन रस्ता सुरक्षा समिती बैठकीत या विषयांचा समावेश करून



तातडीने निर्णय घेण्याची मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. निवेदनानुसार पुणतांबा-जळगाव-वाकडी-दिघी या मार्गावरील सुमारे २५ किलोमीटरचा प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्ता पूर्णतः खराब झाला असून त्याचे नव्याने बांधकाम करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गणेशनगर फाटा ते वाकडी टर्निंग पॉईंट दरम्यानचा २ किलोमीटर जिल्हा परिषद रस्ताही अत्यंत खराब अवस्थेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.श्रीरामपूर एमआयडीसी ते धनगरवाडी दरम्यानचा ७०० मीटर रस्ता जड वाहतुकीमुळे खराब झाला असून या मार्गावर मजबूत डिझाईनचा नवीन रस्ता उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय रेल्वे अंडरपासमार्गे धनगरवाडीपर्यंतचा चार किलोमीटरचा रस्ता तसेच खैरी-नाऊर-श्रीरामपूर-गोवर्धन-सराला बेट मार्गे जोडणारा १२ किलोमीटरचा रस्ताही नव्याने करण्याची मागणी करण्यात आली आहे. पावसाळ्यात सप्ताह होणार असल्याने भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व रस्त्यांची कामे सप्ताहापूर्वी पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी अभिजीत पोटे यांनी केली आहे.

## महिलांनी स्वावलंबी बनून कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीत योगदान द्यावे : पुष्पाताई काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : वाढत्या महागाईच्या काळात केवळ एका व्यक्तीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले असून महिलांनीही आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनून कुटुंबाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे प्रतिपादन प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. पुष्पाताई काळे यांनी केले. महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर व पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांसाठी आयोजित व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण उपक्रमांतर्गत ब्युटी पार्लर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना कोपरगाव येथे प्रमाणपत्र व मोफत मेकअप किटचे वाटप करण्यात आले. यावेळी सौ. पुष्पाताई काळे बोलत होत्या.

त्या म्हणाल्या, पती-पत्नी हे संसाररूपी रथाची दोन चाके आहेत. महिलांनी कौशल्याधारित प्रशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे ही काळाची गरज आहे. ब्युटी पार्लर व्यवसाय महिलांसाठी उत्पन्नाचे प्रभावी साधन ठरू शकते. महिलांनी पार्लर व्यवसायासोबत ज्वेलरी व कपड्यांची विक्री करून उत्पन्न वाढवावे, असा सल्लाही त्यांनी दिला. ग्रामीण भागातील महिलांनी चूल आणि मूल यापुरते मर्यादित न राहता आत्मनिर्भर बनावे, यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या सहकार्याने प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळ विविध उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी महिलांना नथ व ज्वेलरी निर्मितीचे प्रशिक्षण देण्यात आले असून त्यासही चांगला प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांनी आपल्या मुलांना चांगले शिक्षण व संस्कार द्यावेत. मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज देश-विदेशात उच्च पदांवर कार्यरत आहेत. त्यामुळे मातृभाषेतील शिक्षण महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास धनसंपदा बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अनिता वहाडणे, नगरसेविका माधवी वाकचौरे, सोनल त्रिभुवन, माजी नगरसेविका वर्षा गंगुले यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलांना विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शिक्षण महर्षी मेजर साहेबराव घाडगे पाटील यांनी स्थापित केलेल्या त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित शैक्षणिक संकुलांमध्ये प्रवेशासाठी पालक व विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत आहे. सक्तीचे बेसिक सैनिकी प्रशिक्षण, देशी-विदेशी खेळांच्या अत्याधुनिक सुविधा आणि मध्यमवर्गीय पालकांना परवडणारी माफक फी यामुळे महाराष्ट्रासह बाहेरील राज्यांतील विद्यार्थ्यांचाही या संस्थांकडे ओढा वाढला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासाफाटा, शेवगाव, ढोरजळगाव-ने, तेलकुडगाव, घोगरगाव, श्रीरामपूर तसेच अमरावती जिल्ह्यातील धामणगाव-रेल्वे येथे त्रिमूर्तीची वसतिगृहयुक्त सैनिकी पद्धतीची शाळा कार्यरत आहेत. केजी ते बारावीपर्यंतच्या वर्गांसाठी २०२६-२७ शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मराठी, सेमी इंग्रजी व इंग्रजी माध्यमांसह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये कॉमर्स, सायन्स, होमसायन्स, डी.एड., बी.एड. व लॉ कॉलेजच्या विविध शाखांमध्ये प्रवेशासाठी दररोज पालकांची गर्दी वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी रायफल शूटिंग, धनुर्विद्या, घोडेस्वारी, मल्लखांब, नेमबाजी, कुस्ती, योगासने, स्केटिंग, पॅरासेलिंग, बोटींग आदी खेळांच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी नीट व जेईई स्कॉलर बॅचेस सुरू असल्याने वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाकडे वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्रिमूर्ती संस्थांकडे कल वाढत असल्याचे दिसून येत आहे.

## भि.रा. खटोड कन्या विद्यालयाचे स्कॉलरशिप परीक्षेत उज्वल यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील भि.रा.खटोड कन्या विद्यालयाने सन २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी स्कॉलरशिप परीक्षेत उज्वल यश मिळविले. विद्यालयातील एकूण ५२ विद्यार्थिनी परीक्षेस बसल्या त्यापैकी ३७ विद्यार्थिनी पात्र झाले आहेत. स्कॉलरशिप परीक्षेचा निकाल ७१.१५ टक्के लागला असून ३७ विद्यार्थिनी स्कॉलरशिपसाठी पात्र झाले आहेत तसेच आठवी स्कॉलरशीप परीक्षेत मृणमयी विजय घोलप हीने ३०० पैकी २३० गुण मिळवून यश संपादन केले. विद्यार्थिनींनी मिळविलेल्या उज्वल यशाबद्दल हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, अध्यक्ष शिरीष मोडक, उपाध्यक्ष रवींद्र गुलाटी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, सहसचिव रणजीत श्रीगोड, अनिल देशपांडे, अशोक उपाध्ये, विद्यालयाचे चेअरमन दत्तात्रय साबळे, ज्युनिअर कॉलेजच्या चेअरमन रिमा गोसावी, प्राचार्या मंगला भोसले, पर्यवेक्षक अनिता शिंदे, मंगला डोळस आदीनी अभिनंदन केले. सदर स्कॉलरशिप परीक्षेसाठी अस्लम शेख, पंकज देशमुख, सुधा कु-हे, राणी शेटे, मंजुषा जोशी आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

# निधन वार्ता

## सुमन तांबे




**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील सुमन जालिंदर तांबे (वय ५३) यांचे हदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःख निधन झाले.
त्यांच्या पश्चात पती , तीन मुली, पुतणे, नातवंडे, जावई, दीर असा मोठा परिवार असून सामाजिक कार्यकर्ते तथा राम बंधू कंपनीतील अधिकारी रविंद तांबे यांच्या ते चुलती होत्या.

## सुखदेव कर्डीले



**चांदा** : नेवासा तालुक्यातील म्हाळस पिंपळगाव येथील प्रगतिशील शेतकरी सुखदेव भगवंता कर्डीले (वय ९२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. म्हाळस पिंपळगाव येथील प्रगतिशील शेतकरी आदिनाथ कर्डीले व बाळासाहेब कर्डीले यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक मुलगी सूना नातवंडे पुतणे असा परिवार आहे.

## पुष्पा नवाळे



**श्रीरामपूर** : तालुक्यातील खंडाळा येथील गं भा. पुष्पा सोपानादेव नवाळे (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने दुःख निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं एक मुलगी, जावई, नातवंड असा परिवार आहे. देवा फोटोग्राफर विजय नवाळे, श्याम नवाळे, निर्मला आरज यांच्या त्या मातोश्री होत.

# गणेगाव ग्रामपंचायतच्या विविध कामांचे कौतुक

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील गणेगाव येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत पंचायत समिती परळी, जि. बीड यांच्या समितीने पाहणी करून ग्राम विकासाच्या विविध कामांची माहिती घेतली. शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार गावाने विविध क्षेत्रांत केलेल्या कामाचे समितीने कौतुक केले. राज्य शासनातर्फे १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानामध्ये सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध व स्वच्छ गाव, मनरेगा योजनांचे अभिसरण, संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास, सामाजिक न्याय, लोकसहभाग व नाविन्यपूर्ण उपक्रम अशा आठ घटकांचा समावेश आहे. गणेगावात लोकसहभागातून शिक्षण, अंगणवाडी विकास, सिंचन व्यवस्था, वृक्षलागवड, स्वच्छता आणि विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत. ग्रामस्थांच्या सहभागामुळे विकास कामांना गती मिळाल्याचे समितीने नमूद केले. पाहणी दौऱ्यात पंचायत समिती परळीचे गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले, विस्तार अधिकारी रणजीत शेंडगे, तमनर, अंभोरे तसेच कराड यांनी विविध विकासकामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी सरपंच सौ. शोभाताई अमोल भनगडे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतीने केलेल्या कामाचे विशेष कौतुक करण्यात आले. ग्राम विकासासाठी योगदान देणाऱ्या ग्रामस्थांचाही समितीने गौरव केला. ग्रामपंचायत अधिकारी अर्चना हारदे, केंद्र चालक मंजुषा सोनवणे, शिक्षक सुनील गुंजाळ, ईश्वर मोरे, अंगणवाडी सेविका प्रणाली भवर, सुनिता कोबरणे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी यांनी अभियान यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

लोकसहभाग, पारदर्शक प्रशासन आणि विकास कामांच्या माध्यमातून गणेगावाने आदर्श ग्रामविकासाचा उत्कृष्ट नमुना उभा केला असून हे गाव राज्यासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना समिती सदस्यांनी व्यक्त केली.

# लेखी आश्वासनानंतर पाणी वापर संस्था विरोधातील उपोषण मागे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : जिल्ह्यातील अनेक पाणी वापर संस्थामधील भ्रष्टचार,गैरप्रकार व गैरव्यवहारा विरोधात दि.१८रोजी चालू केलेले उपोषण मागण्या मान्य झाल्याने व लेखी पत्र मिळाल्याने भारतीय जनसंसदच्या कार्यकर्त्यांनी त्याच दिवशी सायंकाळी मागे घेतले.

कोणत्याही पाणी वापर संस्थेच्या संबंधितांनी पाणीपट्टी रोख स्वीकारू नये, पाणी वापर संस्थांचे लेखापरीक्षण व्हावे आणि पाणी वापर संस्थांनी केलेल्या दुरुस्ती व इतर कामांची माहिती मिळावी यासाठी केलेल्या प्रश्नावर प्रत्यक्ष चर्चेत कार्यकारी अभियंता सायली पाटील, उपकार्यकारी अभियंता धनश्री



शिंदे, उप अभियंता नेवासा - अभिषेक पवार,उप अभियंता घोडेगाव - संदीप पवार, उप अभियंता चिलेखनवाडी - स्वप्नील देशमुख आदिंनी मान्य केल्या व त्यांनी उपोषण थांबवावे असे आवाहन केले. यावर उपोषणार्थींनी लेखी पत्राची मागणी केली असता,पुढील प्रमाणे लेखी पत्र देण्यात आले.

सर्व पाणी वापर संस्थांनी शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी घेणे व संस्थेने शासनाकडे पैसे भरणेचे सर्व व्यवहार बँकेमार्फत करण्यात यावे,रोख पाणीपट्टी न स्वीकारता शेतकऱ्यांनी बँकेत भरून त्यांची पावती संस्थेकडे घेण्याबाबत कळविण्यात येईल,तसेच पेमेंट गेटवे उपलब्ध करून देण्याबाबत वरिष्ठ पातळीवरून मार्गदर्शन मागविण्यात येईल. लेखापरीक्षण न केलेल्या संस्थांना लेखापरीक्षण करण्याबाबत तातडीने कळविण्यात येईल व लेखापरीक्षण अहवाल देण्यात येईल. पाणी वापर संस्थांनी चाऱ्या दुरुस्ती व इतर कामे केलेली आहेत ती माहिती घेऊन सविस्तर माहिती देण्यात येईल. याबाबतीत उपोषणकर्त्यांचे समाधान झाल्याने उपोषण मागे घेण्यात आले.

भारतीय जनसंसदचे नेवासा तालुकाध्यक्ष रामराव पाटील भदगले, उपाध्यक्ष कारभारी गरड यांनी दि.१८ रोजी मुळा पाटबंधारे विभागीय कार्यालयासमोर सुरु केलेल्या उपोषणात राज्य निमंत्रक अशोक सब्बन, जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे,नगर तालुका अध्यक्ष पोपटराव साठे, विरबहादूर प्रजापती, राळेगणसिद्धी कार्यालयाचे अन्सार शेख, विकास गाजरे आदी सहभागी झाले होते. तसेच शेतकरी संघटनेचे मनोहर मतकर,शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे कानिफनाथ कदम यांनी सहभागी होऊन पाठिंबा व्यक्त केला .

# कॉकरोच जनता पार्टी हे सत्ताधारी आणि विरोधकांसाठी आव्हान : आ. तांबे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : सध्या इंस्टाग्रामवर कॉकरोच जनता पार्टी नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी कुणीतरी मला त्याचं पेज पाठवलं. पहिल्यांदा पाहिल्यावर मलाही वाटलं, हा कदाचित एखादा स्टँडअप कॉमेडीचा प्रकार असेल, किंवा नेहमीसारखा एखादा वायरल ट्रेंड असेल. पण जसजसं त्याकडे लक्ष गेलं, त्याचं स्वरूप समजत गेलं, तसं जाणवलं की हा विषय केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नाही. आजच्या तरुणाईच्या मनात साचलेली अस्वस्थता, राग, निराशा आणि व्यवस्थेबद्दलचे प्रश्न व्यक्त होण्यासाठी हा एक नवा मार्ग बनत चालला आहे, असे स्पष्ट मत नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी व्यक्त केले. आ. सत्यजित तांबे यांनी कॉक्रोच जनता पार्टी बद्दल स्पष्ट व सविस्तर मत व्यक्त केले. ते म्हणतात की, आजची पिढी पूर्वीसारखी फक्त सभांमधून किंवा मोर्चांतून प्रतिक्रिया देत नाही. ती रील्समधून बोलते, मीम्समधून प्रश्न विचारते आणि सोशल मीडियातून व्यवस्थेला आरसा दाखवते. त्यामुळे कॉकरोच जनता पार्टीकडे केवळ विनोद म्हणून बघणं योग्य ठरणार नाही. पण त्याचवेळी, एक गोष्ट वास्तववादीपणे समजून घ्यावी लागेल. सोशल मीडियावर लाखो फॉलोवर्स असणं आणि प्रत्यक्ष राजकीय आव्हान उभं करणं या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. राजकारणात निवडणुका लढवण्यासाठी फक्त वायरल होणं पुरेसं नसतं. त्यासाठी कार्यकर्त्यांचं जाळं लागतं, संघटन उभं करावं लागतं, लोकांमध्ये सातत्याने काम करावं लागतं, जमिनीवर संघर्ष करावा लागतो. सोशल मीडियामुळे एखादी व्यक्ती प्रभाव निर्माण करू शकते, लोकांच्या मतांवर परिणाम करू शकते, इनफ्लून्सर बनू शकते; पण मतांचं रूपांतर मतदानात आणि मतदानाचं रूपांतर विजयात करणं हे पूर्णपणे वेगळं रसायन आहे. म्हणूनच कॉकरोच जनता पार्टी उद्या प्रत्यक्षात मोठं राजकीय आव्हान बनेल की नाही, हे आज सांगणं कठीण आहे. पण या सगळ्याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. कारण या ट्रेंडमधून एक स्पष्ट संदेश समोर येतो आहे. सत्ताधाऱ्यांनी यामधून बोध घ्यायला हवा की समाजात, विशेषतः तरुणांमध्ये, किती अस्वस्थता आहे आणि ते कोणत्या गोष्टींवर प्रतिक्रिया देत आहेत. तर विरोधकांनीही विचार करण्याची गरज आहे की अनेक तरुणांना पारंपरिक विरोधकांमध्ये स्वतःचा आवाज का ऐकू येत नाही. त्यामुळेच ते अशा नव्या, वेगळ्या आणि उपरोधिक माध्यमांकडे आकर्षित होत आहेत. माझ्या मते, या सगळ्यामागे शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा, करिअरबद्दलची असुरक्षितता आणि व्यवस्थेकडून संवादाचा अभाव हे मोठे मुद्दे आहेत. लाखो तरुण प्रयत्न करत आहेत, पण त्यांना भविष्याबद्दल स्पष्टता दिसत नाही. जेव्हा व्यवस्थेकडून त्यांना उत्तरं मिळत नाहीत, तेव्हा ते स्वतःची भाषा तयार करतात. आज सोशल मीडिया हीच त्यांची भाषा बनली आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक पिढी आंदोलनाची स्वतःची पद्धत निवडते. पूर्वी मोर्चे होते, नंतर टीव्हीवरील चर्चा आल्या, आणि आता इंस्टाग्राम रील्स, मीम्स आणि वायरल पोस्ट्स हा नव्या पिढीचा सार्वजनिक चौक झाला आहे. म्हणून कॉकरोच जनता पार्टी ही केवळ एका पेजची गोष्ट नाही. ती आजच्या तरुणाईच्या मनात काय चाललं आहे, हे समजून घेण्याची एक संधी आहे.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि .२२ मे २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९<br>६८०<br>७७० | ४-८ | १७०<br>१८९<br>११६ | जोड<br>४१-०८-२३-७६-८९ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६<br>१२८<br>११९ | १-० | १९०<br>२८०<br>४६० | जोड<br>१४-६०-९३-७५-०८ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२३<br>१५०<br>३३० | ६-४ | १४९<br>२३९<br>६८० | जोड<br>६९-१४-२५-७९-४३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

# शिक्षकाची जनगणना व पर्यावरण रक्षणाची मशाल!

## सायकलवरून प्रवास करत अमोल शिंदे यांचा चर्चेत आलेला आदर्श

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** आजच्या काळात वेग, सुविधा आणि दिखाऊपणाच्या स्पर्धेत माणूस पर्यावरण, आरोग्य आणि सामाजिक जबाबदारी विसरत चालला असताना, श्री राघवेंद्रस्वामी विद्यानिकेतन बोल्हेगाव अहिल्यानगर येथे पदवीधर शिक्षक म्हणून कार्यरत असलेले अमोल शिंदे यांनी आपल्या कृतीतून समाजासमोर एक प्रेरणादायी उदाहरण उभे केले आहे. केंद्र सरकारच्या जनगणना मोहिमेचे काम त्यांनी पूर्णपणे सायकलवरून पार पाडत इंधन बचत हीच खरी देशसेवा हा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचवला आहे.

विशेष म्हणजे, शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना शिक्षण देतानाच अमोल शिंदे हे अर्थशास्त्र विषयात पीएचडीचे संशोधनही करत आहेत. अभ्यास, अध्यापन आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर समतोल साधत त्यांनी जनगणना मोहिमेत सहभाग घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देताना त्यांनी कोणत्याही मोटार वाहनाचा वापर न करता सायकलची निवड केली.



जनगणना म्हणजे केवळ माहिती संकलनाचे काम नसून, नागरिकांशी संवाद साधत शासन आणि समाज यांच्यातील दुवा मजबूत करण्याची प्रक्रिया असते. उन्हाचा तडाखा, सततचा प्रवास, दुर्गम भागातील फेरफटका आणि वेळेचे बंधन या सर्व अडचणी असूनही अमोल शिंदे यांनी चेहऱ्यावर हास्य ठेवत सायकलवरून हे काम पूर्ण केले. त्यांच्या या कृतीने अनेकांना आश्चर्याचा धक्का तर दिलाच, पण त्याचबरोबर प्रेरणाही दिली.

घराघरात जनगणनेसाठी पोहोचणाऱ्या या शिक्षकाकडे नागरिकांनी केवळ कर्मचारी म्हणून पाहिले नाही, तर सामाजिक जाणीव जपणारा जबाबदार नागरिक म्हणून त्यांचे स्वागत केले. सरकारी काम करताना इतक्या प्रामाणिकपणे पर्यावरणाचा विचार करणारे व्यक्तिमत्त्व दुर्मिळ आहे, अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.

अर्थशास्त्र विषयात पीएचडी करत असताना संसाधनांची बचत, शाश्वत विकास आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यावर अभ्यास करणारे अमोल शिंदे यांनी हे विचार केवळ पुस्तकापुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष जीवनात उतरवले आहेत. त्यामुळे त्यांचे कार्य अधिक प्रभावी आणि प्रेरणादायी ठरत आहे.

आज सोशल मीडियावर त्यांच्या सायकलवरील जनगणनेची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असून, तरुण वर्ग, विद्यार्थी आणि शिक्षक वर्गातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. देश बदलायचा असेल तर सुरुवात स्वतःपासून करा, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला आहे.

# कौटुंबिक वादातून नगरमध्ये जीवघेणा हल्ला

## आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** न्यायप्रविष्ट असलेल्या कौटुंबिक वादाच्या न्यायालयीन कामासाठी अहिल्यानगर शहरात आलेल्या वाशी, नवी मुंबई येथील अजीज अहमद बेग खान यांच्यावर कथितरीत्या जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, अन्यथा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा अजीज खान यांनी दिला आहे. याबाबत त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी त्यांनी केली आहे.

अजीज अहमद बेग खान यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांची सासरवाडी अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर परिसरात असून,



कौटुंबिक वादासंदर्भातील प्रकरण सध्या नगर न्यायालयात सुरू आहे. संबंधित प्रकरणाच्या सुनावणीसाठी ते नगरमध्ये आले असताना त्यांच्यावर काही व्यक्तींनी अचानक हल्ला करून गंभीर मारहाण केली. या मारहाणीत त्यांच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत होऊन हात फ्रॅक्चर झाला असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

या घटनेप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम ११८ (२), ११८ (१), ११५ (२), ३५१ (२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊनही मुख्य आरोपी हुसेन खान, आजम खान व इतर संबंधित आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप अजीज खान यांनी केला आहे. आरोपी खुलेआम फिरत असून त्यांच्याकडून जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. पोलिसांनी योग्य ती कार्यवाही न केल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा अजीज अहमद बेग खान यांनी दिला आहे.

# ८३ वर्षाच्या आजोबांनी सर केला तोरणा

## जामखेडच्या शिवप्रेमींची ऐतिहासिक गडकोट जल तीर्थयात्रा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जामखेड येथील शेकडो शिवप्रेमींनी अनोखी 'शिवतीर्थ जल यात्रा' काढून संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेतले. विशेष म्हणजे या मोहिमेत वयोवृद्धांनी सहभाग घेत तरुणांना लाजवेल असा पराक्रम गाजवला.



एका दिवसात तोरणा-राजगड सर या जल यात्रेदरम्यान शिवभक्तांनी किल्ले तोरणा, किल्ले राजगड, किल्ले रोहिडा, तीर्थक्षेत्र मांढरदेवी व कृष्णा नदी अशा पवित्र स्थानांहून जल कलश भरून आणले. पक्कड पोटफोडे (वय ८३), शिवाजी नाना खंडागळे (वय ७७) व जगदाळे मामा (वय ७३) या वयोवृद्ध शिवभक्तांनी तरुणांना सोबत घेऊन गड चढून दाखवले. एकाच दिवसात तोरणा व राजगड हे दोन दुर्गम किल्ले सर करून तेथील पवित्र जल आणण्याची कामगिरी या मावळ्यांनी फत्ते केली.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला जलाभिषेक या पवित्र जलाने ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला शिवछत्रपतींच्या मूर्तीवर जलाभिषेक करण्यात येणार आहे. अनेक नद्या, तीर्थक्षेत्रे व गडकोटांचे जल एकत्र करून हा अभिषेक सोहळा पार पडेल, अशी माहिती आयोजकांनी दिली.

पाच दिवसीय समाजप्रबोधन व भव्य मिरवणूक प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही जामखेडमध्ये श्री शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा होणार आहे. तसेच शिस्तबद्ध पद्धतीने भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, यामध्ये बाहेर राज्यातील नामांकित वाद्य पथके विशेष आकर्षण येणार आहेत

हा उत्सव गावाचा सण, रयतेचा उत्सव

हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून 'गावाचा सण व रयतेचा उत्सव' म्हणून साजरा केला जातो, अशी भावना शिवप्रेमींनी व्यक्त केली पांडुराजे भोसले यांचे आवाहन अजूनही ज्यांना शक्य असेल त्यांनी नद्यांचे, गडकोटांचे व तीर्थक्षेत्रांचे पवित्र जल घेऊन यावे, असे आवाहन पांडुराजे भोसले यांनी यावेळी केले ऐन उन्हाळ्यात, दगडधोंड्यांच्या वाटा तुडवत, वयाचा विचार न करता शिवकार्यासाठी धावून येणाऱ्या या मावळ्यांनी श्री शिवराज्याभिषेक सोहळ्यास जल आणले.

# गृहउद्योजिका मीरा बेरड यांना 'परिणीता सन्मान २०२६' प्रदान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील गृहउद्योजिका मीरा बाळासाहेब बेरड यांना खारघर, नवी मुंबई येथे परिणीता सोशल फाऊंडेशनच्या वतीने प्रतिष्ठेचा 'परिणीता सन्मान २०२६' प्रदान करण्यात आला. लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर (नवी मुंबई) येथील बॅन्क्वेट हॉलमध्ये झालेल्या भव्य सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी चित्रपट निर्मात्या अमृता राव, मानसी इंगळे, मधुराज बिल्डर्सचे मधु पाटील, ईपीआरच्या संचालिका अपर्णा शाह यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित राहून महिला उद्योजिकांचा गौरव केला.

नगर तालुक्यातील दरेवाडी गावच्या रहिवासी असलेल्या मीरा बेरड यांनी स्वामी समर्थ स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून स्वतःचा 'अमृत फूड प्रोडक्ट्स' हा गृहद्योग सुरू केला. अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून सुरू झालेला हा व्यवसाय आज यशस्वी उद्योगात परिवर्तित झाला.गेल्या पाच वर्षांपासून त्या विविध खाद्यपदार्थांचे उत्पादन करून बाजारपेठेत स्वतःचा वेगळा ठसा उमटवत आहेत.

मीरा बेरड यांनी बचत गटाच्या माध्यमातून उद्योग व्यवसाय उभे केले आहे. या उद्योगामुळे अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. केवळ रोजगारच नव्हे, तर महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्याचे कामही त्या सातत्याने करत आहेत. त्यांच्या प्रेरणेतून अनेक महिलांनी लघुउद्योग क्षेत्रात पाऊल टाकले असून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

'अमृत फूड प्रोडक्ट्स' अंतर्गत तयार होणाऱ्या विविध खाद्यपदार्थांना ग्राहकांकडून मोठी पसंती मिळत आहे.

# दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध : आ. कर्डिले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** राहुरी विधानसभा मतदारसंघातून नुकतेच निवडून आलेले आ. अक्षय शिवाजीराव कर्डिले यांचा भाजपा दिव्यांग विकास आघाडी, अहिल्यानगर जिल्हाच्या वतीने स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाभरातील दिव्यांग बांधव, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात उपस्थिती दर्शवत आमदार कर्डिले यांना पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात दिव्यांगांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी बोलताना आमदार अक्षय कर्डिले यांनी दिव्यांग, निराधार आणि गरजू नागरिकांच्या प्रश्नांसाठी स्व. आ. शिवाजीराव कर्डीले साहेब यांनी नेहमीच अग्रक्रमाणे मदत केली, तसेचं जास्तीत जास्त शासकीय सवलती व सुविधा त्यांच्या पर्यंत पोहचवण्यासाठी जिल्हा अध्यक्ष वसंत शिंदे सर यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले,आपणही प्राधान्याने तेंच काम करणार असल्याचे सांगितले.

संजय गांधी निराधार योजनेतील जेष्ठ नागरिक, विधवा माता भगिनींनीसाठी सध्या असलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा २१ हजार रुपये अत्यंत अपुरी आहे. वाढती महागाई आणि बदललेली आर्थिक परिस्थिती लक्षात घेता ही किमान एक लाख रुपये करण्यात यावी, असें निवेदन भाजपा दिव्यांग विकास आघाडी यांच्या वतीने आमदार कर्डीले यांना देण्यात आले. निवेदन स्वकरल्यानंतर आ. साहेबांनी यासाठी येत्या अधिवेशनात शासनाकडे निवेदन सादर करणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शासनाच्या विविध योजना खऱ्या अर्थाने तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आमदार कर्डिले म्हणाले की, दिव्यांग बांधवांना केवळ सहानुभूती नको तर संधी, सन्मान आणि स्वावलंबनाची गरज आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि शासकीय योजनांमध्ये त्यांना प्राधान्य मिळावे यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. दिव्यांगांच्या अडचणी समजून घेऊन प्रशासन स्तरावर ठोस निर्णय घेण्यासाठी मी सदैव उपलब्ध राहीन. त्यांच्या या भूमिकेला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे नेतृत्व भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांनी केले. आपल्या मनोगतात ते म्हणाले की, आमदार अक्षय कर्डिले हे सर्वसामान्य, दिव्यांग आणि वंचित घटकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नेतृत्व आहे. त्यांच्या माध्यमातून दिव्यांगांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडल्या जातील, अशी आम्हाला अपेक्षा आहे.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत काळे, जिल्हा उपाध्यक्ष ईश्वर गुंड, तालुका अध्यक्ष श्रीकांत काळे, शहर अध्यक्ष विजय पडोळे, नगर तालुका उपाध्यक्ष श्री.संदिप विटकर,नगर शहर उपाध्यक्ष अक्षय डहाळे श्री.रघुनाथ धनवडे, श्री.मोहसीन शेख, स्वामी पडोळे, इत्यादी जिल्हा पदाधिकारी यांच्यासह अनेक दिव्यांग बांधव आणि भगिनी स्व. आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्यावर प्रेम असणारे असंख्य एकनिष्ठ कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमात आमदार कर्डिले यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी किल्ला चौक ते बुऱ्हाणनगर ते छत्रपती संभाजी नगर रोडला जोडल्या जाणाऱ्या रस्त्याला कार्यसम्राट आ. शिवाजीराव कर्डीले मार्ग असें नाव देण्याचा प्रस्ताव संघटनेच्या वतीने आ. अक्षय कर्डीले यांना देण्यात आला.

द•ख•ल

## चेक न वटल्याने महिलेस कारावासाची शिक्षा

**अहिल्यानगर :** धनादेशाचा अनादर प्रकरणी महिलेस तीन महिने कारावासाची शिक्षा व ६ लाख ५४ हजार ६३७ रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश अहिल्यानगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी जी. जी. सोनी यांनी दिले. वैष्णवी विकेश गायकवाड हीस धनादेशाचा अनादर केल्याप्रकरणी तीन महिन्याची साधी कैद व ६ लाख ५४ हजार ६३७ रुपयांच्या नुकसान भरपाईची रक्कम देण्याचे तसेच सदरची रक्कम न दिल्यास पुन्हा सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा नुकतीच सुनावली आहे. याबाबत माहिती अशी की, वैष्णवी विकेश गायकवाड ही महिला व रोहित राजेंद्र बडे यांनी भागीदारी व्यवसाय सुरू केलेला होता. या व्यवसायातून रोहित राजेंद्र बडे यांना बाहेर पडण्यासाठी रक्कम ठरविण्यात आली. सदरची रक्कम देण्यासाठी वैष्णवी विकेश गायकवाड यांनी रोहित राजेंद्र बडे यांना धनादेश दिला होता. मात्र सदरचा धनादेश बँकेत भरल्यानंतर अनादरीत झाला. त्यामुळे रोहित राजेंद्र बडे यांनी अॅड. गोरक्ष पालवे यांच्यामार्फत महिलेस नोटीस देऊन धनादेशाच्या रकमेची मागणी केली होती. मात्र सदरची रक्कम दिलेली नसल्यामुळे रोहित राजेंद्र बडे यांनी येथील न्यायालयामध्ये निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट चे कलम कलम १३८ प्रमाणे खटला दाखल केला होता. या खटल्याचा मा. न्यायालयाने न्याय निर्णय देऊन सदर महिलेस तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा व सहा लाख ५४ हजार ६३७ रुपये नुकसान भरपाईची रक्कम फिर्यादी यांना देण्याचे आदेशित केले.

## कोतवाली पोलीस स्टेशनच्या विशाल दळवी यांना उत्कृष्ट तपासासाठी प्रशस्तीपत्र



**अहिल्यानगर :** भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील खुनाच्या क्लिष्ट आणि आव्हानात्मक गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपींना अटक करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याबद्दल कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस हेड कॉन्स्टेबल विशाल अशोक दळवी यांना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. दि. २७ एप्रिल रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाणे गु.र.नं. २२२/२०२६, बीएनएस कलम १०३(१), २३८ (३)(५) अंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास करताना मिसिंग व्यक्ती प्रसाद रोहिदास जाधव यांचा खून झाल्याचे उघडकीस आले. आरोपींनी वाकोडी शिवारात त्यांचा उसाच्या शेतात लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यांचा खून केला. या प्रकरणात गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत विशाल दळवी यांनी आरोपींचा शोध घेतला. आरोपी शुभम हरि भोसले (वय २०, रा. वाकोडीफाटा) आणि समाधान उर्फ बाळ्या रामदास सोनवणे (वय ४२, रा. बुरुडगाव) यांना अटक करून गुन्ह्याचा छडा लावण्यात आला.

## माळीवाड्यातून टेम्पो चोरणारा जेरबंद

**अहिल्यानगर :** शहरातील माळीवाडा परिसरातून २० मे रोजी दुपारी चोरीला गेलेला टाटा कंपनीच्या टेम्पो कोतवाली पोलिसांनी अवघ्या काही तासात मोठ्या शेतात घेऊन पकडला जाहीर सादिक शेख राहणार नारायण डोह तालुका नगर असे आरोपीचे नाव असून त्याच्या ताब्यातून चोरीचा टेम्पो हास्यगत केला आहे याबाबत माहिती अशी की नगर तालुक्यातील पारगाव भातोड येथील प्रवीण गोपीनाथ गुंड यांचा मालवाहू टेम्पो क्रमांक एम एच १६ सीडी १६ ७५ हा दुपारच्या वेळी माळीवाडा परिसरातील एका दुकानासमोर उभा केला असता चोरट्याने चोरून नेला याबाबत त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली त्यानंतर कोतवालीच्या पोलीस पथकाने याचा तात्काळ तपास करून अवघ्या काही तासात टेम्पो सह आरोपी जाहीर शेख याला पुणे बस स्थानकाजवळील पकडले या कारवाई कामे कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रवीण पाटील पोलीस अंमलदार बाळकृष्ण दौंड विनोद बोरगे राहुल शिंदे साबीर शेख विशाल दळवी विजय ठोंबरे दत्तात्रय कोतकर सचिन लोळगे शिरीष तरटे अतुल काजळे अमोल गाडे दीपक रोखले सुरज कदम सत्यम शिंदे रमेश शिंदे अतुल लाटे याकूब शेख राहुल गुंडू व महिला पोलीस कॉन्स्टेबल पल्लवी रोखले यांच्या पथकाने परिश्रम घेतले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत शहरटाकळी विद्यालयाचे यश

**एरंडगाव :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाने या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी एकूण ६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी एकूण ५६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या गुणवंत विद्यार्थ्यांना इयत्ता ५वी साठी सहशिक्षक किरण कुढेकर, अमोल गाडगे, शशिकांत सूर्यवंशी, सोनाली सुसे यांचे तर इयत्ता ८ वी साठी अनिता दारकुंडे, शशिकांत काकडे, आशा कानडे, आदिनाथ काटे या शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. या सर्व गुणवंतांचे व सर्व शिक्षकांचे अॅड. डॉ. विद्याधर काकडे, जि.प.सदस्या हर्षदाताई काकडे, प्रा.डॉ.लक्ष्मणराव बिटाळ, पृथ्वीसिंह काकडे यांनी अभिनंदन केले.

# बकरी ईदच्या दिवशी गोवंश किंवा गोहत्या केल्यास कठोर कारवाई

## पोलिस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे यांचा शांतता समितीच्या बैठकीत इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** बकरी ईदच्या काळात शहरात कुठेही गोवंश किंवा गोहत्या तसेच प्राणी संरक्षण अधिनियमानुसार कत्तल करण्यास प्रतिबंध असलेल्या कोणत्याही प्राण्याची कत्तल केल्यास केल्यास संबंधितांवर कायद्यानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल असा इशारा शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे यांनी दिला आहे. मुस्लीम धर्मियांचा बकरी ईद हा सण २७ मे रोजी साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर २० मे रोजी सायंकाळी शहरातील



कोतवाली पोलिस स्टेशनच्या आवारात शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक डॉ.दिलीप टिपरसे, कोतवालीचे पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड, तोफखान्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, भिंगार कॅम्प चे स.पो.नि. जगदीश मुलगीर यांचे उपस्थितीत मुस्लिम समाजातील मौलाना, खाटीक व बकरी व्यवसायीक, मुस्लीम समाजाचे प्रमुख पदाधिकारी आणि शांतता कमेटीचे सदस्य यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी मुस्लीम धर्मियांना बकरी ईद हा सण शांततेत साजरा करण्यात यावा, अनाधिकृतपणे गोवंश जातीचे जनावरांची कत्तल होणार नाही, उघडयावर कोणीही कत्तल कराणार नाही, शासनाने ठरवुन दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करावे या बाबत सुचना देण्यात आल्या तसेच सोशल मिडीयाव्दारे कोणीही आक्षेपार्ह पोस्ट अथवा व्हीडीओ प्रसारीत करणार नाही याबाबत सुचना दिल्या. तसेच कायदे व नियम डावलून कोणी बेकायदेशीर कृत्य केल्यास पोलिस प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला. यावेळी साहेबान जहागीरदार यांनी ही मुस्लिम समाजाला आवाहन करताना पोलिसांच्या सूचनांचे सर्वांनी तंतोतंत पालन करावे, प्रतिबंधित प्राण्यांची हत्या होणार नाही याची काळजी घ्यावी. पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच महापालिकेने मुकुंदनगर परिसरात तात्पुरत्या कत्तलखान्याची व्यवस्था करावी, जेथे जेथे कुर्बानी दिली जाणार आहे तेथे घंटागाडीची व्यवस्था करावी, समाजानेही कुर्बानीनंतरचा कचरा घंटागाडीतच टाकावा. पोलिसांनी सर्व मशिदींच्या परिसरात बंदोबस्त तैनात करावा, कोणीही सोशल मिडीयावर अफवा पसरवू नये असे आवाहन केले.

**पोलिसांची छापेमारी : चौंघावर गुन्हा**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शहरातील कोठला परिसरात दोन ठिकानी छापे मारून गोमांस, लोखंडी सत्तूर, वजन काटे, डिफ्रिज, असा २ लाखाचा मुद्देमाल जप्त करून चौंघाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी राहुरी यांचे कार्यालय ता. राहुरी, जि. अहिल्यानगर**
Email id - tahasilrahuri11@gmail.com
दुरध्वनी क्र. (०२४२६) २३२६६०

क्र. दंडव्य/जन्म/एसआरनं./८१/२०२५
राहुरी दि. १८/०५/२०२६

**जाहिर नोटीस**

**राहुरी येथील मा. तहसिलदार यांचे न्यायालयात**

श्री. ज्ञानदेव जयवंत साबळे
रा.निंभेरे, ता.राहुरी,जि.अहिल्यानगर ---अर्जदार
**विरुध्द**
ग्रामपंचायत अधिकारी
निंभेरे, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर ------सामनेवाला

श्री. ज्ञानदेव जयवंत साबळे रा. निंभेरे, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर यांनी दि.११/०९/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज देऊन त्यांची बहिण **श्रीमती. विमल जयवंत साबळे (माहेरकडील नांव) श्रीमती. विमल शशिकांत आंधळे (सासरकडील नांव )** यांचा जन्म दि.३०/०५/१९७४ रोजी निंभेरे, ता. राहुरी येथे झाला असून जन्माची नोंदणी होऊन दाखला मिळावा म्हणून विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जाची पोलीस निरीक्षक राहुरी, ग्राम महसूल अधिकारी निंभेरे व ग्रामपंचायत अधिकारी निंभेरे यांचेमार्फत सविस्तर चौकशी केली असून त्यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे. ग्रामपंचायत अधिकारी, निंभेरे, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर यांनी श्रीमती विमल जयवंत साबळे यांचा जन्म दि. ३०/०५/१९७४ रोजी निंभेरे, ता. राहुरी येथे झालेला आहे. परंतू, निंभेरे गावचे सन १९७४ सालचे जन्म नोंदणी रजिस्टर पाहिले असता सदर रजिष्टरमध्ये जन्माची नोंद आढळून येत नाही. असा दि. ०८/०९/२०२५ रोजी दाखला दिला आहे. तसेच अर्जदार श्री. ज्ञानदेव जयवंत साबळे यांनी दि.०८/०९/२०२५ रोजी प्रतिज्ञापत्र नोंदवून दिले आहे. तरी **श्रीमती. विमल जयवंत साबळे** यांचे जन्माची नोंद होणेबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत तहसिल कार्यालय राहुरी येथे कागदोपत्री पुराव्यासह सदरची हरकत दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माच्या नोंदीबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून तसा आदेश पारीत करणेत येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही हरकत अथवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरची जाहिर नोटीस आज दि. १८/०५/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही
**(डॉ. अमित पवार)**
**तहसिलदार राहुरी**

द • ख • ल

## सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे निवृत्तीवेतन रखडले..

**माळशिरस (प्रतिनिधी )** मे महिना संपत आला तरीही पुणे जिह्यातील



सुमारे नऊ हजारांहुन अधिक सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे माहे एप्रिलचे निवृत्तीवेतन जमा झाले नाही परिणामी शिक्षकांना कर्जाचे हप्ते, औषधोपचार व घरगुती खर्चासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. प्रशासनाच्या या दिरंगाईबद्दल पुणे जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना राज्याचे संघटनेचे अध्यक्ष वसंत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचे अध्यक्ष विठ्ठल गुरव,महिला आघाडी प्रमुख रंजना मेमाणे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.या प्रसंगी सर्व तालुक्याचे अध्यक्ष यावेळी उपस्थित होते. जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी विशाल पवार यांनी हे निवेदन स्वीकारत या बाबत

## आळंदीत अधिकमासानिमित्त आध्यात्माची पर्वणी अखंड हरिनाम सप्ताह,

**आळंदी :** अधिकमासानिमित्त श्रीक्षेत्र आळंदी नगरीत सध्या भक्ती, नामस्मरण आणि आध्यात्माची पर्वणी अनुभवायला मिळत आहे. शहरातील विविध मंदिरे, मठ, धर्मशाळा आणि भक्तनिवासांमध्ये अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा, कीर्तन, प्रवचन, सत्संग आणि भजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला आहे. अधिकमासाला हिंदू



धर्मात विशेष धार्मिक महत्त्व असल्याने राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक आळंदीत दाखल होत आहेत. पहाटेच्या काकडा आरतीपासून रात्री उशिरापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम सुरू असल्याने शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. संत साहित्य, अभंग, गवळणी आणि हरिपाठाच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्माची अनुभूती मिळत आहे. शहरातील प्रमुख माऊली मंदिरांमध्ये दररोज प्रवचनकार, कीर्तनकार आणि हभप मंडळींची सेवा सुरू असून भागवत धर्म, संत परंपरा आणि नामस्मरणाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले जात आहे. अनेक ठिकाणी महिलांसाठी भजन मंडळे, युवकांसाठी हरिपाठ आणि सामूहिक नामजपाचे उपक्रमही राबविण्यात येत आहेत. भाविकांसाठी महाप्रसाद, दिंडी सोहळे, पालखी प्रदक्षिणा तसेच सामूहिक आरतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून स्थानिक नागरिकही उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. अधिकमासाच्या निमित्ताने संपूर्ण आळंदी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली असून राम कृष्ण हरी च्या अखंड जयघोषाने वातावरण मंगलमय झाले आहे.

## शिंगवेच्या जंगलात खैर माफियांचा धुमाकूळ

**वळती :** आंबेगाव तालुक्यातील शिंगवे गावच्या वनहद्दीत तब्बल ३८ खैर जातीची मौल्यवान झाडे अज्ञात चोरट्यांनी तोडून लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मोठ्या प्रमाणावर झालेल्या वृक्षतोडीमुळे परिसरात खळबळ उडाली असून वनविभागाच्या निष्काळजीपणावर ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने खैर झाडांची कत्तल केली. त्यानंतर



मौल्यवान लाकूड वाहनांच्या सहाय्याने जंगलातून बाहेर काढण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. खैर हे आर्थिकदृष्ट्या अत्यंत मौल्यवान झाड मानले जात असल्याने या चोरीमागे संघटित रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होऊनही वनविभागाला याची कुठलीही माहिती कशी मिळाली नाही? जंगल परिसरातील गस्त नेमकी कुठे होती? असे सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत. वनहद्दीत सुरू असलेल्या अवैध हालचालींकडे संबंधित विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. चोरीस गेलेल्या झाडांची नोंद घेऊन पुढील तपास सुरू करण्यात आला असून संबंधित चोरट्यांचा शोध घेण्यासाठी हालचाली सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, या प्रकारामुळे वनसंपदेचे मोठे नुकसान झाले असून पर्यावरणप्रेमी आणि ग्रामस्थांकडून संताप व्यक्त केला जात आहे. दोषींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी तसेच वनहद्दीत नियमित गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मुरघास संयंत्र वाटप योजना: पशुपालकांना उद्योजक होण्याची संधी

## पशुपालक व शेतकरी समुहगटांना लाभ घेण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिकतेची जोड देऊन पशुपालकांना उद्योजक बनवण्यासाठी शासनाकडून 'मुरघास संयंत्र वाटप' ही महत्त्वपूर्ण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेव्दारे पशुपालकांना मुरघास हार्वेस्टर व बेलर संयंत्रावर भरघोस अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार असून, जास्तीत जास्त पात्र पशुपालक व शेतकरी समुहगटांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना एकाच वेळी चार ओळी हार्वेस्ट करणारे हार्वेस्टर आणि मुरघास बेलर संयंत्र दिले जाणार आहे. या उपकरणाची मर्यादा २६ लाख रुपयांपर्यंत असून, सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५० टक्के अनुदान (कमाल रु. १३ लाख) तर अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गासाठी ७५ टक्के अनुदान (कमाल रु. १९.५० लाख) मिळणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याकडे पुढील बाबी असणे आवश्यक आहे: किमान १० मोठे पशुधन किंवा १०० शेळ्या / मेंढ्या असणे अनिवार्य, स्वतःचा किमान ५० क्ष्ज्ञ चा ट्रॅक्टर असणे आवश्यक, निवडीमध्ये अत्यल्प भूधारक, अल्प भूधारक, वनहक्क धारक व महिला बचत गटांना प्राधान्य दिले जाईल, दिव्यांगांसाठी ५ टक्के व महिलांसाठी ३० टक्के आरक्षण लागू असेल. आवश्यक कागदपत्रे : पशुधन विकास अधिकाऱ्यांचे पशुधन संख्या प्रमाणपत्र, ट्रॅक्टरचे आरसी (ठउ) कार्ड (स्वतःच्या किंवा कुटुंबातील सदस्याच्या नावे), बँकेचे कर्ज मंजुरी पत्र किंवा स्वनिधीतून खरेदी करणार असल्यास स्व-हिश्श्याची रक्कम बँक खात्यात असल्याचे एक महिन्याचे बँक स्टेटमेंट, दिव्यांग असल्यास णूखू प्रमाणपत्र व बचत गट सदस्य असल्यास संबंधित प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

निवड झालेल्या लाभार्थ्याने जिल्हा उपायुक्तांनी कळवल्यापासून, मंजुरीनंतर ३ महिन्यांच्या आत संयंत्र खरेदी करणे बंधनकारक आहे, अन्यथा प्रतीक्षा यादीतील पुढील उमेदवाराला संधी दिली जाईल. उपकरणाच्या किमतीत निर्धारित खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्यास, फरकाची रक्कम लाभार्थ्याला स्वतः भरावी लागेल. अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (इढ डरे) जमा केली जाईल. ''वैरण विकास योजना अंतर्गत ''मुरघास संयंत्र वाटप योजनेव्दारे उद्योजकता विकास करणे'' या योजनेमध्ये खालील शेतकरी समुहगटाचाही समावेश करण्यात आला आहे. सहकार अधिनियम / धर्मादाय आयुक्त अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी उत्पादक संस्था / सहकारी संस्था, कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी, आत्मा अंतर्गत (तालुका कृषी अधिकारी यांचे नोंदणी प्रमाणपत्र असलेला नोंदणीकृत संस्था शेतकरी समुह गट, महिला आर्थिक विकास महावितरण नोंदणीकृत समूह आधारीत संसाधन केंद्र (सामुदायिक व्यवस्थापित संसाधन केंद्र), आणि उमेद अंतर्गत नोंदणीकृत प्रभाग संघ

पात्रता:- संस्थेचे किमान ५० शेतकरी सदस्य असावेत. संस्थेचे भागभांडवल / खेळते भागभांडवल किमान रु. ५ लक्ष असावे. संस्थेचे लगतच्या मागील ३ वर्षाचे लेखापरीक्षण झालेले असावे.लेखापरीक्षण अहवालानुसार संस्था नफ्यात असावी. या योजनेंतर्गत प्राप्त होणारे लाभधारकांचे अर्ज विचारात घेऊन वरील समुह गटांना प्राधान्य देण्यात येईल. वैरण विकास योजना अंतर्गत ''मुरघास संयंत्र वाटप योजनेव्दारे उद्योजकता विकास करणे या योजनेमध्ये नमूद इतर अटी जसाच्या तशा लागू राहतील. ही योजना पशुपालकांना चारा टंचाईवर मात करण्यासाठी व स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी सुवर्णसंधी आहे. पात्र पशुपालक व शेतकरी समुह गटांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांचे कार्यालयाशी संपर्क साधून सर्व अटी व शर्तींची पूर्तता करत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

## वीजबिल शून्यावर आणणारा विद्यार्थ्यांचा अभिनव सोलर प्रोजेक्ट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित सोनिया गांधी पॉलीटेक्निक मधील इलेक्ट्रिकल विभागाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अंतिम वर्ष प्रोजेक्ट अंतर्गत सौरऊर्जे वर आधारित अभिनव सोलर पॅनल पॉवर सिस्टम प्रकल्प यशस्वीपणे साकारत महाविद्यालयाचे वीजबिल शून्यावर आणण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांच्या या कल्पक आणि पर्यावरणपूरक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या या प्रकल्पामध्ये सौरऊर्जेच्या माध्यमातून विद्युत निर्मिती करून महाविद्यालयातील विविध विद्युत उपकरणांचा वापर करण्यात आला. वाढत्या वीजदराच्या पार्श्वभूमीवर पर्यायी ऊर्जास्रोतांचा प्रभावी वापर कसा करता येऊ शकतो, याचे उत्कृष्ट उदाहरण विद्यार्थ्यांनी या प्रकल्पातून दाखवून दिले आहे.या प्रकल्पासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल नागवडे यांचे मार्गदर्शन लाभले.



तसेच विभागप्रमुख प्रविण बाबर आणि इलेक्ट्रिकल विभागातील इतर शिक्षकांनी सातत्याने तांत्रिक मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे तसेच अहमदनगर जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे यांनी प्रकल्पाला भेट देत विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि संशोधन वृत्तीला चालना देणारे असे उपक्रम भविष्यासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक दृष्टीकोन न ठेवता समाजोपयोगी आणि ऊर्जा बचतीचा संदेश देणारा उपक्रम राबविल्याने या प्रकल्पाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. ग्रामीण भागात अशा सौरऊर्जा प्रकल्पांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला. या अभिनव प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, तांत्रिक कौशल्य आणि ऊर्जा संवर्धनाची जाणीव निर्माण होत असून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेतही भर पडत आहे. आजचा विद्यार्थी, उद्याचा ऊर्जा-सैनिक, हे या प्रकल्पाने पुन्हा सिद्ध केले आहे.

## पुरंदर केमिस्ट असोसिएशनचा देशव्यापी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** कॉर्पोरेट कंपन्यांची बेकायदेशीर ऑनलाइन औषध विक्री आणि बाजारातील एकाधिकारशाहीविरोधात पुरंदर तालुक्यातील औषध विक्रेते रस्त्यावर उतरले होते. अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेच्या (अखजडू) देशव्यापी आवाहनाला प्रतिसाद देत पुरंदर तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने ऐतिहासिक बंद पुकारला होता. तालुक्यातील २५० हून अधिक दुकानदारांनी २० मे रोजी स्वतः हून व्यवसाय बंद ठेवून या अन्यायाविरुद्ध तीव्र आक्रोश व्यक्त केला. यावेळी पुणे जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे सदस्य धैर्यशील शिंदे यांनी ऑनलाइन कंपन्यांच्या कारभारावर गंभीर बोट ठेवले. शिंदे म्हणाले, ''ऑनलाइन औषध कंपन्या केवळ नफ्यासाठी नियम धाब्यावर बसवत आहेत. डॉक्टरांच्या वैध चिठ्ठीशिवाय सर्रास औषधांची घरपोच डिलिव्हरी केली जात आहे. यामुळे तरुण पिढीमध्ये अंमली आणि प्रतिबंधित औषधांचा गैरवापर वाढण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक केमिस्ट नेहमीच ग्राहकांच्या आरोग्याला आणि सुरक्षिततेला प्राधान्य देतात, मात्र या बेकायदेशीर स्पर्धेमुळे आता छोट्या व्यावसायिकांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.''वास्तविक पाहता, देशातील औषध व्यवसाय हा 'ड्रग्ज अँड कॉस्मेटिक्स ॲक्ट १९४०' आणि 'रूल १९४५' अंतर्गत अत्यंत नियंत्रित आहे. असे असतानाही स्पष्ट कायदेशीर तरतुदींअभावी कॉर्पोरेट कंपन्यांनी बाजारपेठ काबीज केली आहे. कोरोना काळात मिळालेल्या तात्पुरत्या सवलतींचा गैरफायदा घेत या कंपन्यांनी महामारीनंतरही अवाजवी सवलतींचे सत्र सुरूच ठेवले आहे. या आंदोलनामुळे ग्रामीण भागातील औषध वितरण व्यवस्था आणि तातडीच्या आरोग्य सेवांवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत होती. स्थानिक रोजगार वाचवण्यासाठी आणि ग्राहकांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबवण्यासाठी शासनाने ऑनलाइन औषध विक्रीवर तात्काळ कठोर बंदी घालावी, अशी मागणी केमिस्ट असोसिएशनने केली आहे. यावेळी महिला एसी मेंबर शुभांगी जगताप, बाळासाहेब भितांडे, तालुका अध्यक्ष सुकुमार नाझीरकर, उपाध्यक्ष नंदकुमार जगताप, भूषण ताकवले, नितीन नाझीरकर, रामभाऊ कदम उपस्थित होते. पुरंदरमधील अभूतपूर्व एकजुटीबद्दल संघटनेने सर्व विक्रेत्यांचे आभार मानले.

## समाज कल्याणच्या योजना वंचितांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यवाही करावी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशानुसार समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांचा व सामाजिक प्रश्नांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आज बैठक आयोजित करण्यात आली. समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी बैठकीत विविध विभागांकडून सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. बैठकीत जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, त्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र स्थापन करण्याबाबत विशेष चर्चा करण्यात आली. ग्रामीण व शहरी भागातील ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक संवाद, आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.



तसेच राज्य शासनाच्या जादूटोणा विरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भातही सविस्तर आढावा घेण्यात आला. समाजात अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत जनजागृती वाढविणे, तक्रारींवर तातडीने कारवाई करणे आणि विविध विभागांमध्ये समन्वय वाढविण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. पुणे जिल्ह्यातील गावांची व वस्त्यांची जातीवाचक नावे बदलण्याच्या प्रक्रियेचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. यासंदर्भातील प्रस्ताव, स्थानिक स्तरावरील कार्यवाही आणि प्रशासनिक प्रक्रिया गतीमान करण्याबाबत निर्देश देण्यात आले. सामाजिक समतेच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा असून संबंधित विभागांनी यावर प्राधान्याने काम करावे, असे सांगण्यात आले. जिल्ह्यातील हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या समस्या, त्यांचे पुनर्वसन, पर्यायी रोजगार, सुरक्षा साधनांची उपलब्धता आणि शासकीय योजनांचा लाभ याबाबतही चर्चा झाली. संबंधित विभागांनी अशा कामगारांची अद्ययावत माहिती संकलित करून त्यांच्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांवरही बैठकीत चर्चा करण्यात आली. स्थलांतर, आरोग्य सुविधा, मुलांचे शिक्षण, निवास आणि शासकीय योजनांचा लाभ यासंदर्भातील विविध मुद्द्यांवर संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले. तृतीय पंथीयांच्या सामाजिक, शैक्षणिक व रोजगारविषयक समस्यांचाही बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, ओळखपत्र, आरोग्य सुविधा आणि कौशल्य विकास प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याबाबत सूचना करण्यात आल्या. बैठकीत घेण्यात आलेल्या सर्व विषयांवर संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करून अहवाल सादर करावा, असे निर्देश सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी दिले. यावेळी जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी राधाकिसन देवढे, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. काही अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहिले तर काही अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले. यावेळी या बैठकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत आढावा घेण्यात आला. प्रलंबित गुन्ह्याच्या अनुषंगाने विहित काल मर्यादेत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

## चासकमान डावा कालवा परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी चासकमान डावा कालवा परिसरातील कालव्याचे दोन्ही बाजूस १०० मीटर हद्दीत ३१ मे २०२६ रोजीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याबाबतचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे. या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ मधील तरतूदी व प्रचलित कायद्यान्वये शिक्षेस पात्र राहिल, असेही आदेशात नमूद केले आहे.

## उंदिरगावच्या शिवस्मारकाला सर्वधर्मीयांचा पाठिंबा ग्रामसभेत सकारात्मक चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** तालुक्यात राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे मानल्या जाणाऱ्या उंदिरगाव येथे प्रस्तावित शिवस्मारकाला सर्वधर्मीय ग्रामस्थांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून ग्रामसभेत या विषयावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. गेल्या तीन महिन्यांपासून गावातील सुशिक्षित तरुणांनी कायदेशीर व शिस्तबद्ध पद्धतीने शिवस्मारक उभारणीसाठी नियोजन सुरू केले आहे.

या संदर्भात गावात दोन ते तीन बैठका घेण्यात आल्या होत्या. सर्वधर्मीय नागरिकांसमोर विषय मांडून हरकती नोंदविण्यासाठी वेळ देण्यात आला. एक जरी हरकत आली तरी विषय मागे घ्यायचा, अशी भूमिका आयोजकांनी जाहीरपणे घेतली होती. मात्र, तीन महिन्यांत कोणतीही हरकत न आल्याने ग्रामस्थांनी स्मारकाला बिनशर्त पाठिंबा दिला. तरीही इच्छुकांना हरकत नोंदविण्यासाठी २७ मेपर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या भास्करराव गलांडे पाटील विद्यालयासमोरील जागेला सर्वानुमते शक्तीस्थळ असे नाव देण्यात आले असून छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त स्मारक फलकाचे अनावरणही करण्यात आले.

२० मे रोजी झालेल्या ग्रामसभेत स्मारकासंदर्भातील निवेदन ग्रामपंचायतीकडे सादर करण्यात आले. ग्रामसभेत सरपंच, ज्येष्ठ नेते, तरुण व ग्रामस्थांनी एकत्रित चर्चा करून स्मारक समितीचे अधिकार ग्रामपंचायत प्रशासनाला देण्याचा निर्णय घेतला. कोणताही निर्णय ग्रामस्थांच्या संमतीशिवाय घेऊ नये, अशी अटही घालण्यात आली.

विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता असल्याने संबंधित ठराव सध्या प्रलंबित ठेवण्यात आला आहे. आचारसंहिता संपल्यानंतर पुढील नियोजन ग्रामस्थांच्या सहभागातून करण्यात येणार असल्याचे ठरले. हे शिवस्मारक सर्वधर्मसमभाव व सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरेल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



## अंजीर 'खट्टा' हंगामाची लगबग; खर्चवाढीने शेतकरी चिंतेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे, पुरंदर :** पुरंदर तालुक्याची ओळख राज्यभर अंजीर उत्पादनासाठी असून तालुक्यात सुमारे साडेचारशे हेक्टर क्षेत्रावर अंजीराची लागवड करण्यात आली आहे. लालबुंद रंग, आकर्षक आकार आणि सुमधुर चवीमुळे येथील अंजीराला बाजारपेठेत विशेष मागणी असते. सध्या अंजीराच्या 'खट्टा' हंगामाच्या तयारीला वेग आला असून बागांमध्ये मशागतीची कामे सुरू झाली आहेत. मात्र मजुरांची टंचाई, वाढती महागाई आणि उत्पादन खर्चात झालेली वाढ यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

अंजीराचा बहर प्रामुख्याने दोन टप्प्यांत घेतला जातो. पावसाळी बहराला 'खट्टा' तर उन्हाळी बहराला 'मिठ्या' हंगाम म्हणून ओळखले जाते. नुकताच मिठ्या हंगाम संपला असून आता शेतकरी खट्टा हंगामासाठी बागांची चाळणी, वाफे तयार करणे, आंतरमशागत आणि खत व्यवस्थापनाच्या कामात व्यस्त झाले आहेत. दिवे परिसरातील अंजीर बागांमध्ये सध्या मशागतीची मोठी लगबग सुरू आहे. अंजीर बागेतील वाफे तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मजुरांची आवश्यकता भासते. मात्र स्थानिक पातळीवर पुरेसे मजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना बाहेरगावाहून मजूर आणावे लागत आहेत. एका वाफ्यासाठी सुमारे शंभर रुपये मजुरी द्यावी लागत असल्याचे अंजीर उत्पादक शेतकरी पोपट झेंडे यांनी सांगितले. त्यामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. मजुरांच्या टंचाईमुळे काही शेतकरी यांत्रिक पद्धतीने बागांची चाळणी करून वाफे तयार करत आहेत. ट्रॅक्टर आणि यंत्रांच्या सहाय्याने कामे जलद गतीने होत असली तरी झाडांच्या मुळांना काही प्रमाणात इजा होत असल्याची शेतकऱ्यांची चिंता आहे. पर्याय नसल्याने अनेकांनी यांत्रिक पद्धतीचा वापर वाढविला आहे. अंजीर हे भांडवली खर्चाचे पीक मानले जाते. रासायनिक खतांच्या वाढत्या किमतींमुळे बाग व्यवस्थापनासाठी मोठा खर्च करावा लागत आहे. त्यातच खाद्यतेल, गॅस तसेच दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या दरवाढीमुळे घरखर्च सांभाळताना मोठी कसरत करावी लागत असल्याची भावना मजूर विलास जाधव आणि तुषार आढे यांनी व्यक्त केली. हे दोघे पुसद येथून दिवे परिसरात कामासाठी आले आहेत. महागाई, मजुरांची टंचाई आणि वाढते उत्पादन खर्च या तिहेरी संकटाचा थेट परिणाम अंजीर शेतीच्या व्यवस्थापनावर दिसून येत आहे. तरीही दर्जेदार उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी आणि बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यासाठी शेतकरी प्रयत्नशील असल्याचे चित्र पुरंदर तालुक्यात पाहायला मिळत आहे.

**अंजीर बागांची योग्य छाटणी आवश्यक :**
**सिताफळ छाटणीप्रमाणे अंजीर फळबागांची नियमित छाटणी करणे आवश्यक आहे. छाटणीमुळे झाडाच्या सर्व भागांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळतो. त्यामुळे तांबेरा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव कमी होऊन चांगल्या प्रतीची फळे मिळतात आणि उत्पादनात वाढ होते, अशी माहिती उप कृषी अधिकारी गणेश जगताप यांनी दिली.**



## धरणे व तलावांमधील गाळ काढण्याच्या कामांना गती द्या-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्ह्यात गाळ मुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत धरणे व तलावांमधील गाळ काढण्याच्या कामांना गती देण्यासाठी जलसंधारण, जलसंपदा , लघु पाटबंधारे जि.प. विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना समन्वयाने आवश्यक कार्यवाही करावी. याबाबतची अधिकाधिकची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सूचना दिल्या आहेत.

अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी त्यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंत्यांना पाठविलेल्या पत्रानुसार, संबंधित धरणांमधील गाळ काढण्यासाठी अंदाजपत्रके तयार करून सविस्तर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालयास सादर करावे. तसेच जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाची आवश्यक मान्यता घेण्याबाबतही सूचना करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, जलसंपदा विभागाकडून आवश्यक परवानगी प्रक्रियेस काही कालावधी लागत असल्यास त्या कालावधीत जिल्ह्यातील अति शोषित, संकटग्रस्त,अर्ध संकटग्रस्त तसेच टँकरग्रस्त गावांमध्ये गाळ काढण्याचे, जलसंधारण व दुरुस्तीची अधिकाधिक कामांबाबत नियोजन करून ती प्राधान्याने घ्याव्यात. यामध्ये विशेषतः भूजल पुनर्भरण क्षमता असलेल्या कामांना प्राधान्य देऊन जलसंधारण संरचनांची दुरुस्ती, गाळ उपसा व पाणी साठवण क्षमता वाढविण्याच्या कामांवर भर देण्यात येणार आहे. या अभियानामुळे पाणीटंचाई कमी होण्यास, भूजल पातळी वाढण्यास तसेच शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होण्यास मदत होईल, असेही श्री. डुडी म्हणाले.

## गौण खनिज स्वामित्वधन वसुलीसाठी पुणे जिल्ह्याला ३५० कोटींचे उद्दिष्ट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** केंद्र शासनाच्या खाण व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ अंतर्गत राज्य शासनास गौण खनिजासंबंधी नियम तयार करण्याचे तसेच स्वामित्वधन निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ लागू केले असून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी गौण खनिजावरील स्वामित्वधन वसुलीचे जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यासाठी ३५० कोटी रुपयांचे महसूल उद्दिष्ट देण्यात आले आहे. राज्य शासनाने जिल्हाधिकारी यांना महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत आणि ग्रामीण क्षेत्रानुसार उद्दिष्टांचे विभाजन करून त्याची माहिती शासनास सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच गौण खनिजावरील स्वामित्वधन, पर्यावरण शुल्क, उपकर, सेवा शुल्क व इतर महसुली रक्कमा संबंधित लेखाशिर्षनिहाय जमा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. संबंधित विभागीय आयुक्तांनी या महसुली वसुलीवर नियमित नियंत्रण ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. सदर उद्दिष्टपूर्ती ३१ मार्च २०२७ पूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व अनधिकृत वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तहसील व उपविभाग स्तरावर दक्षता पथके स्थापन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन होणार नाही यासाठी उत्खनन स्थळांची वेळोवेळी पाहणी करून एढड मशीनद्वरे मोजणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अवैध उत्खनन मोठ्या प्रमाणावर आढळणाऱ्या जिल्ह्यांनी विशेष उपाययोजना आखून त्याबाबत शासनास अहवाल सादर करावा, असेही नमूद करण्यात आले आहे.महसुली विभागांनी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करणे आवश्यक असून विभागीय आयुक्तांना आवश्यकतेनुसार विभागांतर्गत जिल्ह्यांच्या उद्दिष्टांमध्ये फेरबदल करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

द•ख•ल

## आनंदाश्रम रायतळे येथे 'रामकृष्णहरी' कथा सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न



**सुपा :** प्रभू श्रीरामांचे आदर्श आचरण, भगवान श्रीकृष्णाची जीवननीती आणि हरिनाम संकीर्तन यातच आनंदी व समाधानी जीवनाचे खरे गमक सामावले आहे, असे प्रतिपादन कथाअभ्यासक तथा गायक-वक्ता राजेंद्र टाक यांनी केले. पारनेर तालुक्यातील रायतळे येथील आनंदाश्रमात अधिकमासानिमित्त आयोजित त्रिदिवसीय 'रामकृष्णहरी' संगीत कथा सोहळ्यात ते बोलत होते. दि. १७ ते १९ मे दरम्यान पार पडलेल्या या सोहळ्याला रायतळे व पंचक्रोशीतील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कथेच्या पहिल्या दिवशी श्रीरामकथेचे महत्त्व स्पष्ट करताना टाक म्हणाले की, रामायण हे केवळ महाकाव्य नसून आदर्श जीवन जगण्याची दिशा देणारा ग्रंथ आहे. श्रीरामांच्या चरित्रातून कर्तव्य, त्याग, संयम आणि मूल्यनिष्ठ जीवनाचा बोध मिळतो. दुसऱ्या दिवशी भगवान श्रीकृष्णावरील कथेत बोलताना त्यांनी सांगितले की, धर्माधारित विचार, बुद्धीमान निर्णयक्षमता आणि परिस्थितीनुरूप योग्य कृती करण्याची शिकवण भगवान श्रीकृष्णांनी दिली. धर्म, कर्तव्य, प्रेम, सत्य आणि व्यवहारज्ञान यांचा समतोल राखण्याचा संदेश त्यांच्या जीवनातून मिळतो. कथा सांगता प्रसंगी त्यांनी मातापित्यांच्या ऋणाची जाणीव, सेवा-दयाभावाचा अंगीकार आणि अहंकाराचा त्याग यांचे महत्त्व विशद केले. जो या मूल्यांचे पालन करतो, तोच खरा वारकरी असून त्यालाच हरी पावतो, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या सांगता प्रसंगी उद्योजक बापूसाहेब डोके यांनी आभार मानले.

## सीना कॅनॉलचे पाणी सर्व शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे ; आंदोलनाचा इशारा

**माहिजळगाव :** विधान परिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सीना कॅनॉलचे रोटेशन सुटले असले, तरी सीना धरणाचे पाणी हेड टू टेल सर्व शेतकऱ्यांना समान पद्धतीने मिळाले पाहिजे, अशी मागणी माहिजळगाव व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी केली आहे. याबाबत पाटबंधारे विभागाला निवेदन देण्यात आले असून, पाणी शेवटच्या टोकापर्यंत न पोहोचल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. माहिजळगाव परिसरातील शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सीना कॅनॉलमधून पाणी सोडण्यात आले असले तरी अनेक ठिकाणी कॅनॉल पूर्ण क्षमतेने चालविण्यात येत नसल्याने शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. काही ठिकाणी कॅनॉलचे दरवाजे उघडे असूनही पाण्याचा वेग कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. यामुळे खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिलेल्या इशाऱ्यानुसार, तात्काळ योग्य नियोजन करून पाणी हेड टू टेल पद्धतीने सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावे, अन्यथा रस्ता रोकोसह तीव्र आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनात अहिल्यानगरचे माजी जिल्हा परिषद सदस्य ड. कैलाश शेवाळे, जिल्हा परिषद माजी सदस्य अशोकराव खेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विचारमंच प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ शिंदे, रवींद्र खेडकर, दिपक काकडे, अशोक कदम, सुदाम जाधव, बापू शिंदे, संतोष घोडके, रामदास टकले, भीमराव साळवे, हनुमंत नवसरे, संतोष राजे निंबाळकर, परशुराम तांबे यांच्यासह माहिजळगाव परिसरातील सर्व शेतकरी सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून पाणी वितरणात पारदर्शकता आणावी व सर्व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

## चिखलीत रंगला जेष्ठ नागरिकांचा सोहळा



**लिंपणगाव :** चिखलीकर व गुरुंच्या प्रेमातून उतराई होण्यासाठी रामदास झेंडे मित्रमंडळाने आयुष्यभर संघर्ष करुन यशाचे सर करणारी माता लिलाबाई झेंडे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने विविध जाती धर्मातील १६३ जेष्ठ नागरिकांचा सन्मान केला यामध्ये जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस सोपानराव मुळे यांचा समावेश होता. हा सन्मान पांडुरंग क्षीरसागर महाराज बाळासाहेब नाहाटा राजेंद्र म्हस्के यांचे हस्ते करण्यात आला माजी आमदार डॉ सुधीर तांबे दुर्गा तांबे जेष्ठ साहित्यिक लक्ष्मणराव ढोबळे यांनीही शुभेच्छा दिल्या. अध्यक्षस्थानी पाटीलकाका महाराज होते पाटीलकाका महाराज म्हणाले की मुल शिकल ही परदेशात जातात आई वडीलांना वृध्दाश्रमाचा आधार घ्यावा लागतो. रामदास झेंडे मित्रमंडळाने जेष्ठांचा सन्मान केला हा आदर्श घेऊन प्रत्येकाने आई वडीलांना जीव लावावा बाबासाहेब भोस म्हणाले कि चिखली करांनी माझ्या राजकिय विजयांना मताधिक्याची आणि विचाराची झालर लावली मी राजकिय संन्यास घेतल्यानंतर याच भुमीत सन्मान झाला. रामदास झेंडे म्हणाले वडीलांचे छत्र लवकर हरपले आईने काळ्या मातीत घाम गाळून चांगले दिवस दाखविले हीच प्रेरणा घेऊन जेष्ठांचा सन्मान करण्याचा उपक्रम राबविला.

## अतिवृष्टीग्रस्त ५२७ शेतकऱ्यांना आर्थिक मदत ; ७८ लाखांचे अनुदान

**जामखेड :** २०२५-२६ खरिप हंगामातील अतिवृष्टी व पुरस्थितीमुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहीरीच्या दुरुस्ती कामासाठी नुकसान झालेल्या जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी अनुदान निधी मंजूर करण्यात आला आहे.महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यश आले आहे. प्राप्त आदेशानुसार जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना दोन टप्प्यांत निधी वितरित करण्यात येणार असून, पहिल्या आदेशात ही१२८ शेतकऱ्यांसाठी सुमारे १८ लाख ६८ हजारांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.तर दुसऱ्या आदेशात ३९८ लाभार्थी शेतकऱ्यांसाठी सुमारे ५९ लाख ७४ हजार अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे.या दोन्ही आदेशांमधून जामखेड तालुक्यातील एकूण ५२७ शेतकऱ्यांना सुमारे ७८ लाख ४२ हजार रुपये आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे.प्रा. राम शिंदे यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याची भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. या मदतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.असे मत बाजार समितीचे सभापती पै.शरद कार्ले यांनी व्यक्त केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नामकरणासाठी उपोषण सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीचे औचित्य साधून जामखेड नगरपरिषदेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जामखेड नगरपरिषद' असे नाव देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.प्रशासनाच्या दिरंगाई आणि चालढकल धोरणाविरुद्ध आक्रमक पाऊल उचलत, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग माने यांनी पुकारलेले बेमुदत 'साखळी उपोषण' आजपासून नगरपरिषद कार्यालयासमोर सुरू झाले आहे.

जामखेड शहराच्या अस्मितेचा आणि अहिल्यादेवींच्या विचारांचा सन्मान करण्यासाठी नगरपरिषदेला त्यांचे नाव मिळावे, यासाठी पांडुरंग माने यांनी गेली अनेक महिने सातत्याने लढा सुरू ठेवला आहे. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासकीय पातळीवर ठोस निर्णय न झाल्याने संतप्त झालेल्या समाजबांधवांनी आणि शहरवासीयांनी आजपासून प्रत्यक्ष आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.



नगरपरिषद कार्यालयासमोर या साखळी उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी व आंदोलनात सक्रिय सहभागासाठी जामखेडमधील विविध क्षेत्रांतील प्रमुख पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

नगरसेवक अरुण जाधव, शिवसेना नेते आकाश बाफना, सोमनाथ राऊत. शिवकुमार डोंगरे, अरुणजी शिरसाठ, मनोज कुलथे, आप्पासाहेब लोंढे, विकी पिंपळे, दत्ता भिसे, ह.भ.प. महारुद्र नागरगोजे, गणेश गायकवाड, नगरसेवक वाशिम सय्यद, सागर सदाफुले, सचिन काशीद, राजू सदाफुले, मुजफ्फर आत्तार, चेतन राळेभात, दत्ता राळेभात, उमेश भोगे, दीपक देशमुख, महेश मासाळ. विकास मासाळ, सचिन मासाळ, विनोद सोनार, रावसाहेब काशीद. कृष्ण अष्टेकर. आशिष डोंगरे, विकास राऊत,अर्जुन निमकर. भुजंग दळवी, अमर चाऊस. सद्दाम पठाण. संतोष थोरात. अमोल वाघोली आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. यावेळी पांडुरंग माने म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यकाळात रयतेच्या कल्याणासाठी जे ऐतिहासिक कार्य केले, त्याच जामखेडच्या भूमीतील नगरपरिषदेला त्यांचे नाव मिळण्यासाठी आपल्याला उपोषणाला बसावे लागते हे दुर्दैव आहे. ३०१ व्या जयंतीचा उत्सव अवघ्या काही दिवसांवर असतानाही प्रशासनाचा उदासीन दृष्टिकोन थोर माऊलीचा अपमान करणारा आहे. जोपर्यंत शासन, नगरपरिषद प्रशासन नामकरणाचा अधिकृत निर्णय जाहीर करत नाही, तोपर्यंत आमचा हा लढा अखंड सुरू राहील.

# तलाव परिसरात पुन्हा मोटार-केबल चोरी

### आठ दिवसांत आरोपींना अटक न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरालगतच्या औटीवाडी येथील काळभैरव तलाव परिसरात पुन्हा एकदा मोटारी आणि तांब्याच्या केबल चोरीची मोठी घटना घडली आहे. चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या मोटारींना जोडलेल्या तांब्याच्या केबल कापून चोरी केली. यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेत सुमारे १५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

सोमवार रात्री औटीवाडी परिसरातील शेतकरी ऊस आणि इतर पिकांना पाणी देत होते. गावात रात्री ९ ते पहाटे ५ या वेळेत वीजपुरवठा सुरू असल्याने अनेक शेतकरी मोटारीद्वारे पाणीपुरवठा करत होते. दरम्यान, मध्यरात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास काही शेतकऱ्यांच्या



मोटारी अचानक बंद पडल्या. पाहणी केली असता, मोटारींना जोडलेल्या तांब्याच्या केबल चोरट्यांनी कापून नेल्याचे उघड झाले. याचवेळी शेतकरी अण्णा रूपचंद औटी आणि नितीन शेळके हे पाहणीसाठी तलाव परिसरात गेले असता त्यांना संशयास्पद पांढऱ्या रंगाची कार दिसली. ग्रामस्थ जवळ येत असल्याचे पाहून कारचालक पसार झाला. दरम्यान वाहनाचा क्रमांक एमएच १२ एनएक्स ६२६६ असल्याचे निदर्शनास आले. यावेळी अंकुश हिरडे यांनी औटीवाडीजवळ वाहन अडवण्याचा प्रयत्न केला. असता कारचालकाने त्यांच्या अंगावर कार घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर चोरटे आढळगावच्या दिशेने पसार झाले. या चोरीत आनंदा औटी, अंकुश हिरडे, अंकुश औटी, गणेश औटी तसेच नगरसेवक दादा औटी यांच्यासह ३६ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, मागील दीड वर्षांपासून काळभैरव तलाव परिसरात सातत्याने मोटार आणि वीज केबल चोरीच्या घटना घडत असून, लाखो रुपयांचा ऐवज लंपास झाला आहे.

# जामखेड तालुक्यात सावकारीविरोधात मोठी कारवाई

### सहकार विभागाच्या एकाच वेळी तीन ठिकाणी धाडी!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाची धडक कारवाई; तीन ठिकाणी छापे, आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आले आहेत. जामखेड तालुक्यात अवैध सावकारीच्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने पोलिस प्रशासनाच्या मदतीने मोठी धडक कारवाई केली. तालुक्यात एकाच वेळी ३ ठिकाणी छापे टाकत अवैध सावकारी करणाऱ्यांविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या कारवाईत कोरे धनादेश, खरेदीखते तसेच इतर आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जामखेड तालुक्यात अवैध सावकारी सुरू असल्याबाबत प्रशासनाकडे आवश्यक कागदपत्र सह तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या आधारे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, विभागीय निबंधक संभाजी निकम आणि जिल्हा निबंधक मंगेश सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरे यांनी जिल्ह्यातील विविध क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा समावेश करून , जामखेड चे पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या समन्वयाने विविध पथके तयार करून सदरची कारवाई केली.

> सहकार आणि पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने तीन ठिकाणी छापे टाकून महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत. सध्या या सर्व कागदपत्रांची सखोल पडताळणी व चौकशी सुरू आहे. सदर पडताळणीअंती पुढील आवश्यक ती कारवाई केली जाईल. नागरिकांनी आर्थिक गरजेसाठी शक्यतो राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्था अथवा परवाना धारक सावकार यांच्याकडूनच कर्ज घ्यावे.
>
> **दिलीप तिजोरे, सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, जामखेड**

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अन्वये ही कारवाई करण्यात आली. सहकार विभागाचे १६ अधिकारी-कर्मचारी आणि पोलिस दलाचे ६ अधिकारी-कर्मचारी अशा २२ जणांच्या संयुक्त पथकाने मंगळवारी दोन संशयित ठिकाणांवर छापे टाकले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे अवैध सावकारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

छाप्या दरम्यान कोरे धनादेश खरेदीखते आर्थिक नोंदी असलेल्या वह्या, तसेच इतर महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. या कागदपत्रांच्या आधारे पुढील तपास आणि चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# शासकीय कर्मचारी करतोय अवैध वाळू उपसा आणि दारू विक्री ?

### ग्रामस्थांची मुख्यमंत्र्यांकडे लिखित तक्रार !

**तिसगाव :** पाथर्डी तालुक्यातील हनुमान टाकळी कोपरे परिसरातील वृद्धा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात खुलेआम वाळू उपसा करणे त्याचबरोबर कोपरे गावाच्या परिसरात एका हॉटेलच्या माध्यमातून बिनधास्तपणे अवैध दारू विक्री केली जाते. हे सर्व उद्योग कोणी एखादा बेरोजगार तरुण करत नसून चक्क प्रधानमंत्री ग्राम सडक योजना विभागातील एक कर्मचारी हे करत आहे. या वाळू उपशामुळे परिसरातील शेतकऱ्यांमधून मोठा संताप व्यक्त केला जात आहे. त्याने सुरू केलेल्या हॉटेलच्या माध्यमातून देखील या परिसरातील तरुणाई मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होऊ लागल्याने अवैधवाळू उपसा व अवैध दारू विक्री करणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी हनुमान टाकळी येथील ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे थेट राज्याचे मुख्यमंत्री व अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. ग्रामस्थांनी निवेदनात म्हटले आहे की, हनुमान टाकळी कोपरे परिसरातील एक व्यक्ती एका विशिष्ट समाजाचा तालुका अध्यक्ष असल्याचे सांगत प्रशासनावर नेहमी दबाव टाकण्याचा प्रयत्न करतो. हा व्यक्ती प्रधानमंत्री ग्रामसडक योजना विभागात कार्यरत असून स्वतः अधिकारी व पदाधिकारी असल्याचे सांगत महसूल व पोलीस प्रशासनाला वेठीस धरत आहे. तो खुलेआम हनुमान टाकळी कोपरे परिसरातील वृद्धा नदीतून ट्रॅक्टर जेसीपी मशीनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करत आहे. त्याचबरोबर कोपरे परिसरात सुरू करण्यात आलेल्या हॉटेलच्या माध्यमातून देखील मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री करत आहे. संबंधित व्यक्ती पत्नीच्या नावाने ठेकेदारी देखील करत आहे. एखादे काम त्याला न मिळाल्यास अर्जद्वारे चौकशीची मागणी करत लगेच आंदोलन उपोषण करून प्रशासनाला वेठीस धरत आहे. येथील अवैध वाळू उपशामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असुन वाळू वाहतुकीमुळे या परिसरातील रस्त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अवैध दारू विक्रीमुळे तरुणाई व्यसनाधीन झाली आहे. आंदोलन उपोषणामुळे विकास कामांना अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने संबंधित व्यक्तीची सखोल चौकशी करून वाळू उपसा व अवैध दारू विक्रीवर योग्य ती कारवाई करावी अन्यथा १ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा महेश संजय बर्डे, मयूर सुभाष बर्डे, बद्रीनाथ सुनील आव्हाड यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

# तेलंगशीच्या तीन सख्ख्या भगिनी बनल्या पोलिस !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** कोणतीही परिस्थिती माणसाला मोठी करत नाही, तर माणसाची जिद्द आणि कष्ट त्याला यशाच्या शिखरावर पोहोचवतात, याचाच प्रत्यय जामखेड तालुक्यातील तेलंगशी गावात पाहायला मिळाला. गावातील एका सर्वसामान्य आणि शेतमजूर क्षीरसागर कुटुंबातील तीन सख्ख्या बहिणींनी दारिद्र्य आणि संघर्षावर मात करत थेट महाराष्ट्र पोलीस दलात वर्दी मिळवून एक नवा इतिहास रचला आहे. एकाच घरातील या 'त्रिमूर्ती' पोलीस झाल्याने संपूर्ण तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



जामखेड तालुक्यातील तेलंगशी हे डोंगरदऱ्यात वसलेले एक छोटेसे खेडेगाव. दळणवळण आणि उच्च शिक्षणाच्या सुविधांचा अभाव असलेल्या या गावात देविदास क्षीरसागर आणि ताराबाई क्षीरसागर हे दांपत्य आपल्या सात जणांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अहोरात्र कष्ट करत होते. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने ते मोलमजुरी करीत. उन्हाळ्याच्या दिवसांत सायकलवरून वाड्या-वस्त्यांवर जाऊन बर्फाचा गोळा, कुल्फी आणि आईस्क्रीम विकण्याचे काम त्यांनी केले. खराब रस्त्यांवरून सायकल ढकलण्यासाठी पत्नी ताराबाईंनी दिलेली साथ आणि दिवाळीत झाडण्या बांधणे, चिंचा गोळा करणे अशी पडेल ती कामे करत या माऊलीने मुलांच्या शिक्षणासाठी रक्ताचे पाणी केले.

ग्रामीण भागात आजही मुलींचे शिक्षण दहावी-बारावी नंतर थांबवून त्यांचे लग्न लावून दिले जाते. मात्र, स्वतः अशिक्षित असलेल्या देविदास क्षीरसागर यांनी मुलींना शिकवले. मुलींनीही आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून, सुट्ट्यांच्या दिवशी शेतात गुरे-शेळ्या सांभाळत आपले अभ्यासिका व मैदानी सराव सुरू ठेवले. या तिन्ही बहिणींनंतर आता त्यांचा लहान भाऊ देखील स्पर्धा परीक्षेची तयारी करत असून, तोही अधिकारी होण्याच्या मार्गावर आहे.

> **अहिल्यानगर ते मीरा-भाईंदर... तिन्ही बहिणी खाकी वर्दीत!**
>
> या क्षीरसागर भगिनींच्या कष्टाला अखेर यश आले असून, आज तिन्ही बहिणी राज्याच्या वेगवेगळ्या पोलीस दलात सेवा बजावत आहेत. रेखा क्षीरसागर - अहिल्यानगर पोलीस दल, शितल क्षीरसागर- पिंपरी-चिंचवड पोलीस दल, संगीता क्षीरसागर - मीरा-भाईंदर पोलीस दल.

# 'काम पूर्ण नसतानाही बिले अदा' ; उपअभियंत्यावर गंभीर आरोप

**नगर तालुका :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नगर उपविभागातील उपअभियंत्यावर गंभीर आरोप करत उक्कडगाव ग्रामपंचायतचे सरपंच नवनाथ म्हस्के यांनी कार्यकारी अभियंत्यांकडे तक्रार दाखल केली आहे. कामे अपूर्ण असतानाही मार्च २०२६ मध्ये बिले अदा करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून संबंधित अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांना पदावरून हटविण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, संबंधित उपअभियंता कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. फोनवर संपर्क साधल्यास प्रतिसाद मिळत नसून अरेरावीची भाषा वापरली जात आहे. श्रीरामपूर उपविभाग व विश्रामगृहाचा अतिरिक्त कार्यभार असल्याचे कारण देण्यात येत असल्याने तो कार्यभार कमी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.



दरम्यान, टाकळी काझी - उक्कडगाव - शिराढोण रस्त्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश २०२३ मध्ये देण्यात आला होता. मात्र मुदत संपूनही केवळ २० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला आहे. रस्ता खोदून ठेवल्यामुळे नागरिकांना अपघातांचा सामना करावा लागत असून भविष्यात जीवितहानी झाल्यास विभाग जबाबदार राहील, असा इशाराही तक्रारीत देण्यात आला आहे.

याशिवाय मांडवा - उक्कडगाव रस्त्याची दुरवस्था, दोषदायित्व कालावधीतही दुरुस्ती न होणे, तसेच अपूर्ण कामांची बिले मंजूर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कामांचे जिओ-टॅगिंग फोटो उपलब्ध असून ते योग्य वेळी सादर करण्यात येतील, असे म्हस्के यांनी म्हटले आहे.

# उदरमल घाटाच्या रखडलेल्या कामासाठी आश्वासनांचा पाऊस

### प्रत्यक्षात काम ठप्प; कोल्हार उदरमलचे नागरिक संतप्त!



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** जेऊर चिचोंडी मार्गे पाथर्डी मार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या कोल्हार उदरमल घाटाचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. काम अपूर्ण अवस्थेत पडून असल्याने या मार्गावर वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हे काम तातडीने सुरू करून पूर्ण करावे, तसेच या दिरंगाईची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकारी आणि संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात जय हिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे यांनी जेऊर व चिचोंडी पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना लेखी निवेदन पाठवले आहे.प्रशासनाच्या उदासीनतेमुळे आता नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत असल्याचे या निवेदनात प्रकर्षाने नमूद करण्यात आले आहे.

> घाटातील रखडलेल्या कामाबाबत जय हिंद फाऊंडेशनने १४ फेब्रुवारी २०२५ रोजी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर प्रशासनाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी आंदोलन स्थगित करण्याची विनंती करत, पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजवून संपूर्ण घाटाचे डांबरीकरण पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, आज तब्बल दोन वर्षे दोन महिने उलटून गेले तरीही प्रशासनाचे हे आश्वासन हवेतच विरले आहे.
>
> **शिवाजी पालवे अध्यक्ष**
> **जय हिंद फाऊंडेश.**

**७ कोटींची तरतूद, तरीही काम अपूर्ण**

निवेदनातील माहितीनुसार, जेऊरवरून पाथर्डीकडे जाणारा कोल्हार उदरमल घाट हा या भागातील वाहतुकीचा मुख्य कणा आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली होती.

'अहिल्यानगर-बुऱ्हानगर-आगडगाव-कोल्हार रस्ता प्रजिमा ४९' अंतर्गत किलोमीटर १५/०० ते १८/०० या टप्प्यासाठी ३५० लाख रुपये मंजूर झाले होते. किलोमीटर १८/०० ते २१/५०० या टप्प्यासाठी दुसऱ्या ३५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

एकूण ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्यानंतर ९ मार्च २०२४ रोजी मोठ्या उत्साहात या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. मात्र, भूमिपूजनानंतर काही दिवसच काम चालले आणि त्यानंतर ते अचानक बंद पडले.

घाटातील काम अर्धवट सोडून दिल्यामुळे सध्या या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. घाटातील रस्ता अत्यंत खराब झाला असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खराब रस्त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, दररोज हजारो नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असल्याच्या भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.

> या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन शासनाने संबंधित कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी एक स्वतंत्र चौकशी समिती नेमावी, झालेल्या कामाच्या दर्जाची कसून तपासणी करावी आणि वेळेत काम पूर्ण न करून जनतेला वेठीस धरणाऱ्या ठेकेदारावर व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशन व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केली आहे. आता मुख्यमंत्री यावर काय पाऊल उचलतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.२२ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


## अहिल्यानगर जिल्ह्यासाठी काँग्रेसचे आता तीन जिल्हाध्यक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : काँग्रेस पक्षाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आता तीन जिल्हाध्यक्ष नियुक्त केले आहेत. पक्षाने संघटन सृजन अभियान अंतर्गत पक्ष संघटनेत फेरबदल करण्याचे जाहीर केले होते. अहिल्यानगर जिल्ह्यात तीन जिल्हाध्यक्ष नियुक्त करताना दोघांची पुनर्नियुक्ती झाली आहे तर तिसर्या अध्यक्षाची नवीन नियुक्ती झाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना शिंदे गट व शिवसेना ठाकरे गटानंतर आता काँग्रेसनेही ग्रामीण जिल्ह्याचे विभाजन करत तीन जिल्हाध्यक्ष नियुक्त केले आहेत. काँग्रेस पक्षाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी दीप चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्षपदी सचिन गुजर (श्रीरामपूर) व दक्षिण जिल्हाध्यक्षपदी किरण पाटील (कर्जत) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे अखिल भारतीय सरचिटणीस वेणुगोपाल यांनी या निवडी जाहीर केल्या. दीप चव्हाण यापूर्वी शहर जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत होतेच तर सचिन गुजर यांच्याकडे जिल्हाध्यक्ष म्हणून पूर्ण जिल्ह्याचे प्रभारी पद होते. आता ग्रामीणसाठी दोन स्वतंत्र जिल्हाध्यक्ष नियुक्त करण्यात आले आहेत. किरण पाटील पूर्वी कर्जत तालुकाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. नियुक्त करण्यात आलेले तिघेही माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे कट्टर समर्थक आहेत.

# अवैध गौणखनिज वाहतुक

## तलाठीच्या कारला हायव्याची धडक; जीवे मारण्याचा प्रयत्न, गुन्हा दाखल



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्यात अवैध गौणखनिज उपसा व वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गस्त घालत असलेल्या तलाठीच्या कारला हायवा वाहनाने जोरदार धडक दिल्याची घटना वैजापूर तालुक्यातील लाखनी भागात घडली. याप्रकरणी हायवा चालकाविरुद्ध जीवे मारण्याचा प्रयत्न तसेच शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी शिऊर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मांडकीचे तलाठी अमरसिंग तेजराव बावनकर (वय ४२), यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार २० मे २०२६ रोजी मध्यरात्री १२.४० वाजेच्या सुमारास शिवना नदी पात्रालगतच्या गावांमध्ये अवैध गौणखनिज उपसा व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी गौणखनिज पथक गस्त घालत होते.

यावेळी जांबरखेडा ते लाखणी रोडवर, निवृत्ती बारसे यांच्या शेताजवळ आरोपी शिवनाथ विश्वनाथ लंबे (रा. जांबरखेडा ता. वैजापूर) याने त्याची पिवळ्या रंगाची टाटा कंपनीची हायवा क्र. एमएच २० जीझेड ६७०६ ही गाडी तलाठी यांच्या दिशेने चालवली. लंबे याने हायवा शासकीय पथकाच्या एमएच ३५ एआर ०४६१ क्रमांकाच्या कारवर समोरून जोरात धडकवली. या धडकेत कार सुमारे ५० फूट फरपटत गेली असून वाहनाचे मोठे नुकसान झाले.

तलाठी बावणकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने जिवे मारण्याच्या उद्देशाने वाहन अंगावर घातले तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी दि. २१ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३६ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रणखांब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून त्यांनी स्वतः तपास हाती घेतला आहे.

### वाळू माफियांचा हिंमत वाढण्यामागे आर्थिक हितसंबंध हेच कारण?

कारवाई साठी आलेल्या महसुलच्या पथकावर हायवा घालून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्याची वाळू माफियांचा हिंमत कशी होते?याचे कारण या भागातील पोलिस व महसूल प्रशासनातील काहींचे असलेले आर्थिक हितसंबंध आहे का? असे प्रश्नही सध्या उपस्थित होत आहे.

### वाळू माफियांचा दादागिरी थांबणार कधी?

वाळू माफियांचा सुरू असलेली दादागिरी थांबणार कधी?अधिकाऱ्यांवर घातलेल्या वाहनाचे हे एक उदाहरण अश्याच शेतकऱ्यांना अथवा सर्वसामान्य जनतेला मारहाणीच्या अनेक घटना समोर येताच असतात मात्र धागेदोरे यंत्रणेत असल्याने त्या बाबी समोर येत नाही.

# देवळाली प्रवरातील अतिक्रमण हटविण्यावरून वातावरण चिघळले



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा शहरात अतिक्रमण हटाव मोहिमेवरून चांगलेच वातावरण तापले असून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संतोष चोळके यांनी प्रशासनावर थेट निशाणा साधत मोठ्या धन दांडग्यांच्या अतिक्रमणांवर कारवाई करण्याची मागणी केली. राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे दि. २० मे २०२६ रोजी मोठ्या पोलिस बंदोबस्तामध्ये अतिक्रमण हटाव मोहीम सुरु करण्यात आली. यावेळी संतोष चोळके म्हणाले कि, अतिक्रमण हटवताना दुजाभाव केला जात असल्याचा आरोप करत त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत केवळ धार्मिक स्थळे, सामान्य नागरिक आणि लहान व्यावसायिकांवर कारवाई केली जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र मोठे व्यावसायिक आणि प्रभावशाली व्यक्तींच्या अतिक्रमणांकडे प्रशासन जाणीव पूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संतोष चोळके यांनी केला आहे.

अतिक्रमण हटवायचे असेल तर सर्वांवर समान कारवाई झाली पाहिजे. गरीबांवरच बुलडोझर चालवून धन दांडग्यांना मोकळे सोडले जाणार असेल तर आम्ही ते सहन करणार नाही, असा इशारा चोळके यांनी दिला. दरम्यान देवळाली प्रवरा शहरातील नागरिकांमधूनही अतिक्रमण हटवताना समान न्याय मिळावा, अशी मागणी होत असून प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रसंगी वंचितचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव, जिल्हा संपर्क प्रमुख पिंटूनाना साळवे, तसेच पास्टर शामवेल साळवे आदिंसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सालवडच्या मावा कारखान्यावर छापा; ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार शेवगाव पोलिसांनी अवैध धंद्यांविरुद्ध धडक मोहीम सुरू केली आहे. याच मोहिमेंतर्गत शेवगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सालवडगाव शिवारात अवैधरित्या चालणार्या एका मावा कारखान्यावर पोलिसांनी छापा टाकला.

या कारवाईत पोलिसांनी तब्बल ३१ लाख ३८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. बुधवार, दि. २० मे रोजी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती.

सालवडगाव गावात राज्यात प्रतिबंधित असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री आणि मशीनच्या साहाय्याने कच्च्या व पक्क्या सुपारीमध्ये सुगंधी तंबाखू मिळवून मावा तयार केला जात आहे. माहिती मिळताच पोलीस निरीक्षकांनी लागलीच तपास पथक बोलावून पंचांसह सालवडगाव शिवारात छापा टाकला. इम्रान निसार शेख (वय २२), सोहेल अफ्सर शेख (वय २१, दोघे रा. सालवडगाव, ता. शेवगाव) या दोघांना ताब्यात घेण्यात आले.पोलिसांनी त्यांच्याकडे असलेल्या मुद्देमालाबाबत विचारपूस केली असता, हा माल मुज्जीप मुस्सा शेख व परवेज मुस्सा शेख (दोघे रा. शेवगाव) यांच्या मालकीचा असल्याचे त्यांनी कबूल केले. या चौघांविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात पो.कॉ प्रशांत आंधळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाजीराव सानप करत आहेत.

### ३१ लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी घटनास्थळावरून दोन वाहने आणि मावा तयार करण्याचे साहित्य जप्त केले आहे. मावा तयार करण्याच्या २ मशीन, सुगंधी तंबाखू/सुपारीचे एकूण ६४ बॉस आणि गोण्या, २७ पोते, १३० किलो तयार मावा, महिंद्रा पिकअप गाडी, छोटा हत्ती, इलेट्रॉनिक वजन काटा, बॅटरी आणि ड्रम-टब असा मिळून ३१ लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### या पथकाने केली कारवाई

सदरची कारवाई शेवगावचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस उपनिरीक्षक बाजीराव सानप, उपनिरीक्षक रामहरी खेडकर, पोलीस हवालदार किशोर काळे, पो.कॉ. भगवान सानप, शाम गुंजाळ, संपत खेडकर, एकनाथ गर्कळ, राहुल खेडकर, सचिन पिरगळ, रोहित पालवे, कृष्णा मोरे, प्रशांत आंधळे आणि अर्जुन मुंढे यांच्या पथकाने केली.

## ‘मराठा समाज : चिंतनातून चिंतामुक्तिकडे’ पुस्तकाचे मंत्रालयात प्रकाशन

### जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते अनावरण; समाजाला नवी दिशा देणारे साहित्य असल्याचे गौरवोद्गार



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : लेखक कैलासराव तुकाराम तुरकणे लिखित ‘मराठा समाज : चिंतनातून चिंतामुक्तिकडे’ या अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी पुस्तकाचे प्रकाशन १९ मे २०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. साईवेद प्रकाशनतर्फे आयोजित या सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राजेंद्र विखे पाटील, सुनील तांबे, तानाजी धसाळ, प्रशांत मस्के तसेच शिवाजीराजे आहेर उपस्थित होते. लोणी परिसरातूनही अनेक मान्यवरांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली. त्यामध्ये प्रा. बी. के. सलालकर, प्राचार्य निलेश घोलप, ज्येष्ठ पत्रकार व प्रकाशक करण नवले, वैभव तुरकणे आणि प्रणित फटांगरे यांचा समावेश होता. पुस्तकाबद्दल बोलताना मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, मराठा समाजासमोरील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि वैचारिक प्रश्नांचा सखोल अभ्यास करून सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न या पुस्तकातून करण्यात आला आहे. चिंतन, आत्मपरीक्षण आणि संघटित सामाजिक उभारणीचा संदेश देणारे हे पुस्तक समाजात जागरूकता निर्माण करणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लेखक कैलासराव तुरकणे यांनी आपल्या मनोगतात समाजातील वाढती दरी, हेवेदावे, सामाजिक असमतोल आणि आत्मपरीक्षणाच्या अभावावर भाष्य केले. समाज उभा राहिला तरच व्यक्ती सुरक्षित राहू शकते, असे सांगत त्यांनी समाजजागृती, रक्तदान, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन आणि सामाजिक कार्यातील अनुभवातून या साहित्याची निर्मिती केल्याचे नमूद केले. समाजाला विधायक दिशा देणारे हे साहित्य भविष्यात सामाजिक परिवर्तनासाठी प्रेरणादायी ठरेल, असा सूर यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## जिल्हा पोलीस दलातील ५ अधिकाऱ्यांची पदोन्नती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : राज्यभरातील ७७ सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावर, तर ४८८ पोलीस उपनिरीक्षकांना सहायक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. राज्याचे पोलीस महासंचालक सदानंत दाते यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या पदोन्नती प्रक्रियेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील एक सहायक पोलीस निरीक्षक व चार उपनिरीक्षकांचा समावेश असून त्यांची पदोन्नतीसह जिल्ह्याबाहेर बदली करण्यात आली आहे. पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांमध्ये नितीन खंडागळे यांना सहायक पोलीस निरीक्षक पदावरून पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांची बदली छत्रपती संभाजीनगर शहर येथे करण्यात आली आहे.

तसेच उपनिरीक्षकांमध्ये विनोद परदेशी, जयेश गांगुर्डे, अजिनाथ कोठाळे आणि समीर अभंग यांचा समावेश आहे. पदोन्नतीनंतर विनोद परदेशी यांची नवी मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे. जयेश गांगुर्डे आणि अजिनाथ कोठाळे यांची नाशिक परिक्षेत्रात बदली करण्यात आली असून समीर अभंग यांची पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती करण्यात आली आहे. २५ मे २००४ नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षकांना त्यांच्या मूळ सेवाज्येष्ठतेनुसार ही पदोन्नती देण्यात आली आहे.

पोलीस दलातील प्रशासकीय प्रक्रियेनुसार ही पदोन्नती करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, पदोन्नती मिळालेल्या अधिका-यांचे सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणी श्रीरामपूरात जोडेमारो आंदोलन




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नीट पेपरफुटी प्रकरणातील आरोपींविरोधात श्रीरामपूर शहरात सर्वपक्षीय संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. मेनरोडवरील गांधी पुतळ्यासमोर आंदोलनकर्त्यांनी आरोपींच्या छायाचित्रांना जोडे मारत संताप व्यक्त केला.

आरोपींना फाशी द्या, विद्यार्थ्यांना न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या आंदोलनात प्रा. शिवराज मोटेगावकर, प्रा. पी. व्ही. कुलकर्णी, प्रा. मनीषा मांढरे, ब्युटिशियन मनीषा वाघमारे, धनंजय लोखंडे, शुभम खैरनार, यश यादव, मांगीलाल बीवाल, दिनेश बीवाल व विकास बीवाल यांच्याविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन म्हणाले, नीट पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ झाला आहे.

या प्रकरणामुळे तीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप असून आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. मनसेचे जिल्हाध्यक्ष बाबा शिंदे यांनी, या आरोपींनी शिक्षकी पेशाला काळिमा फासला असून त्यांची संपत्ती आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी केली.

काँग्रेसचे माजी नगरसेवक राजेंद्र सोनवणे यांनी या प्रकरणाची व्यापक चौकशी करून मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्याची मागणी केली. महिला आघाडीच्या रमादेवी धिवर यांनी हे रॅकेट अनेक वर्षांपासून सुरू असल्याची शक्यता व्यक्त केली. यावेळी विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना देण्यात आले.

## राष्ट्रीय कार्यकारिणीतील नावे वगळणे ही लिपिकीय चूक!

### गैरसमज दूर झाले : राष्ट्रवादीतील कथित वादावर तटकरेंचे स्पष्टीकरण



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक** : राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या पत्रात झालेली नावे वगळण्याची घटना ही लिपिकीय चूक असल्याचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले. तसेच, दुरुस्ती करून नव्याने पत्र निवडणूक आयोगाकडे पाठवले जाईल, असेही त्यांनी सांगितले. अलिकडेच पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांची नावे वगळल्याने पक्षात नाराजी असल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या.


त्यातच सुप्रिया सुळे आणि शशिकांत शिंदे यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची शक्यता फेटाळल्याने राजकीय चर्चांना अधिक उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर तटकरेंनी स्पष्ट केले की, पक्षातील सर्व गैरसमज दूर झाले असून वरिष्ठ नेत्यांची बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीत छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, प्रफुल्ल पटेल आणि अन्य वरिष्ठ नेते उपस्थित होते. वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चा होऊन तोडगा काढण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, आपण आजही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असून त्याच पदावरून पत्रकार परिषद घेत असल्याचे तटकरेंनी नमूद केले.

पक्षाची पुढील राजकीय वाटचाल भाजपसोबतच राहील, असेही त्यांनी स्पष्ट संकेत दिले. दरम्यान, या पत्रकार परिषदेमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वरिष्ठ नेत्यांचे महत्त्व कायम असल्याचे अधोरेखित झाले आहे. पक्षात पवार कुटुंबीयांचे वर्चस्व वाढत असल्याच्या चर्चांदरम्यान तटकरेंच्या भूमिकेला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

> प्रफुल्ल पटेल व तटकरेंची नावे पुन्हा समाविष्ट होणार
> वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत वादांवर तोडगा
> राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पद कायम असल्याचा दावा
> भाजपसोबतच राजकीय वाटचाल सुरू राहणार
> दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणावर अनिश्चितता

## दहेगाव बोलका येथे गॅस टाकीचा स्फोट

### एकाच कुटुंबातील तिघे जखमी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यातील दहेगाव बोलका येथे गुरुवार (दि.२१) सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास स्वयंपाकाच्या गॅस टाकीचा स्फोट होवून एकाच कुटुंबातील तीन व्यक्ती जखमी झाल्या आहेत. सदर घटनेची बातमी समजताच आमदार आशुतोष काळे यांनी आरोग्य विभागाला तातडीने उपचार करण्याच्या सूचना दिल्या. दहेगाव बोलका येथे गुरुवार (दि.२१) सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास सुनील सोन्याबापू कर्पे यांची मुलगी भाग्यश्री (वय १८) हि गॅस स्वयंपाक करीत असतांना अचानकपणे गॅस टाकीचा स्फोट होवून यामध्ये सुनील कर्पे स्वत: त्यांची मुलगी भाग्यश्री व मुलगा ओंकार (वय १६) हे जखमी झाले.

गॅस टाकीचा स्फोट झाल्यानंतर मोठा आवाज होवून घराच्या पत्र्यांचे देखील नुकसान झाले आहे. सदरच्या घटनेबाबत आमदार आशुतोष काळे यांनी आरोग्य विभागाला सूचना देण्याबरोबरच गॅस टाकीचा स्फोट कशामुळे झाला याचा तपास करण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत. सुनील कर्पे यांची पत्नी घराबाहेर कपडे धूत असल्यामुळे व त्याची आई देवदर्शनासाठी मंदिरात गेल्यामुळे सुदैवाने त्यांना काही झाले नाही.

सदर घटनेसंदर्भात आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.गिरीश गुट्टे तसेच पुढील उपचाराची गरज पडल्यास जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्याशी संपर्क साधून त्यांनाही या घटनेची माहिती देवून तातडीने उपचार करण्याच्या करण्याच्या सूचना दिल्या. मात्र जखमी तिघांचीही प्रकृती काहीसी गंभीर असल्याने त्यांना उपचारासाठी प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी येथे दाखल करण्यात आले.

आ.आशुतोष काळे यांनी प्रवरा ग्रामीण रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधून तातडीने उपचार सुरु करण्यास सांगितले असून त्यांच्यावर उपचार सुरु झाले आहेत.